अत्याधुनिक नेत्र शिबीर
चष्मा घालवा कायमचा
✻ कॉन्टयूरा व्हिजन ✻ मोतिबिंदू ✻ काचबिंदू ✻ नेत्ररोपण
मोफत नेत्रतपासणी सवलतीच्या दरात लेसर नेत्रशस्त्रक्रिया
शनिवार सकाळी १० ते १
डॉ. कांकरियांचे साई सूर्य नेत्रसेवा दृष्टी साजरी करा
वर्धमान, माणिक चौक, अ नगर ४१४००१
Help line 9112288611 / 8888982222

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

संपादक : सुभाष गुंदेचा — व्यवस्थापक : अनिकेत गुंदेचा

रजि नं. ११४३९-५७/३७ | पाने ८ | किंमत ३ रूपये | अहिल्यानगर, मंगळवार दि. ०१.०४.२०२५ | अंक नं. ३३० | वर्ष ६८ वे | दैनिक वर्ष ६२ वे | ANR/022/2018-2020

Mount Litera Zee School
NURTURING POTENTIAL, UNLEASHING BRILLIANCE
CBSE AFFILIATION NO 1130870
Admissions open 2025-26
Daund Road, Arangaon, Ahilyanagar 414006
नर्सरी ते दहावी पर्यंत दर्जेदार शिक्षण प्रणाली
FUTURE READY SCHOOL
माऊंट लिटेरा झी स्कूल
अरणगांव, दौंड रोड, अहिल्यानगर
8263063744 / 7038730387

प्रशस्त दालन प्रशस्त वाहनतळ होलसेल विभाग विनम्र सेवा
बस्ता बांधायला यायचं हं!
विश्वसनीय वस्त्रांची अखंड परंपरा
राजपाल™
संगमनेर (02425) 222226
अ. नगर (0241) 2999299
नारायणगाव (02132) 242132
श्रीरामपूर (02422) 220090

# बाजारपेठेमध्ये विशिष्ट समाजाकडून व्यापाऱ्यांवर दहशत; कारवाईसाठी शिष्टमंडळाचे पोलिस अधीक्षकांना निवेदन

नगर – शहरातील कापड बाजार परिसरात विशिष्ट समाजातील गुंड प्रवृत्तीच्या लोकांकडून जमाव तयार करून व्यापाऱ्यांवर दहशत निर्माण करण्याचे कृत्य केले जात असून, यातून दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक हल्ले करत आहेत. या प्रकारा विरोधात शहरातील समस्त शीख, पंजाबी, सिंधी समाजातील व्यापाऱ्यांनी १ एप्रिल रोजी दुपारी पोलिस अधीक्षक राकेश ओला यांची भेट घेत अशा अनिष्ठ प्रवृत्तीला आळा घालण्याची मागणी निवेदनाद्वारे केली आहे.


बाजारपेठेतील गुंडांविरोधात कारवाई करण्याचे निवेदन पोलिस अधीक्षक राकेश ओला यांना देताना व्यापाऱ्यांचे शिष्टमंडळ. समवेत आमदार संग्राम जगताप (छाया – लहू दळवी)


निवेदनात म्हटले आहे की, २९ मार्च रोजी संध्याकाळी ४.३० बाजेच्या दरम्यान एम. जी. रस्त्यावर गुरनुरकौर परमिंदरसिंग नारंग यांच्या कापड दुकान समोर रस्त्यावर गाडी लावणारे आरोपी आजमत उर्फ अज्जू खान यास दुकानास अडथळा होत असल्याचे सांगितले असता तक्रारदार मुलीची छेडछाड करुन, शिवीगाळ करुन, मारहाण केली. तसेच तिचा भाऊ स्लोक दिपसिंग यास लोखंडी स्टुलने मारहाण केली. आरोपीचा भाऊ आर्शद आसिफ खान, आदनान नदिम शेख, शाहिद पिंजारी यांनी आणि त्यांच्या समाजातील दुष्ट प्रवृत्तीचे लोक जमा करून या कुटुंबाला अमानुष मारहाण केली होती. त्याबाबत कोतवाली पोलिस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. सदर आरोपी व त्यांच्या समाजातील इतर गुंड प्रवृत्तीच्या ठराविक लोकांना जमा करुन नेहमीच व्यापाऱ्यांवर दहशत करतात. दोन समाजामध्ये तेढ निर्माण करण्यासाठी जाणीवपूर्वक दुसऱ्या समाजावर हल्ले करून दहशत निर्माण करतात. ज्या ठिकाणी घटना घडली, तो भाग नो हॉकर्स झोन आहे. तरीही हे लोक सदर रस्त्यावर जाणुनबुजून अतिक्रमण करुन दुकानासमोर त्यांच्या हातगाड्या लावतात. तसेच स्थायिक दुकान असणाऱ्या व्यापाऱ्यांना शिवीगाळ व दमदाटी करुन दहशत करतात. या बाबींकडे पोलिस प्रशासन व महापालिका प्रशासन नेहमीच डोळेझाक करत आहेत. त्यामुळे या समाजाची दहशत जास्तच वाढत चालली आहे. संपूर्ण एम.जी. रोड व घासगल्ली रस्त्यावर या लोकांनी अतिक्रमण करत हातगाड्या लावुन वाहतुकीस अडथळा करत आहेत. अनेक मोठे व्यापारी जे शासनास लाखो, करोडोचा टॅक्स भरतात, त्यांच्या दुकानासमोर हातगाड्या लावुन व्यापाऱ्यास, दुकान व्यवसायात अडथळा करून त्रास देतात. दादागीरी करून 'हमारे आदमी इकठ्ठा करके तुमको मार डालेंगे' अशा धमक्या देतात. या भागात रमजानचा महिन्यात सुद्धा पोलिस प्रशासनाने पेट्रोलिंग केलेली नाही, बंदोबस्तही नव्हता.

गेल्या महिन्यात एवढी मोठी घटना होऊनही त्यावेळी एकही पोलिस कर्मचारी तत्काळ घटनास्थळी आला नाही. यापूर्वीही हातगाडीवर व्यवसाय करणाऱ्या याच समाजाच्या लोकांनी दिपक नवलानी यांच्या दुकानात घुसून त्यांना चाकुने भोसकून जिवे मारण्याचा प्रयत्न केल्याची घटना घडली होती. तरीही अजून प्रशासनाला जाग आली नाही. या समाजाची या भागात मोठी दहशत निर्माण झालेली आहे. या रोडवर अतिक्रमण करून, दादागीरी करुन व्यापाऱ्यांमध्ये भितीचे वातावरण निर्माण केलेले आहे.

या अतिक्रमणधारकांमध्ये बरेच बांग्लादेशी नागरिक दिसून येतात. त्यामुळे त्यांची ओळख पटवणेसुध्दा शक्य होत नाही. अशा घटनांमुळे दोन समाजात बिनाकारण तेढ निर्माण होऊन भविष्यात मोठी घटना घडण्याची शक्यता आहे. त्यामुळे अशा गुंड व नंगड प्रवृत्तीच्या लोकांना वेळीच आळा घालण्याची आवश्यकता निर्माण झालेली आहे. त्यामुळे पुढील अनर्थ निश्चितच टळला जाईल. तरी वरील आरोपींविरुध्द त्वरीत कडक कारवाई करण्यात यावी तसेच सदर भागात हातगाडीधारकांनी नो हॉकर्स झोन असतानाही के लेले अतिक्रमण काढून त्वरीत शांतता प्रस्तापित करण्यात यावी, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे.

यावेळी आ. संग्राम जगताप, सिख समाज अध्यक्ष बलदेवसिंग वाही, पंजाबी समाज अध्यक्ष प्रदीप पंजाबी, सिंधी समाज अध्यक्ष महेश मध्यान, राधाकृष्ण मंदीर अध्यक्ष राकेश गुप्ता, रजिंदरसिंग चावला, सतिंदरसिंग नारंग, परमिंदरसिंग नारंग, विकी मल्होत्रा, हितेश ओबेरॉय, अनिल सबलोक आदी उपस्थित होते.

आनंदाचे क्षण अविस्मरणीय करण्यासाठी...
IMA भवन
पुष्पक लॉन्स
बुकींग चालू आहे.
✻ भव्य मॅरेज हॉल ✻ सुसज्ज लॉन्स ✻ डायनिंग हॉल ✻ प्रशस्त पार्कि व्यवस्था ✻ सर्व सोयींयुक्त रूम्स
आपल्या बजेट नुसार सर्व प्रकारचे पॅकेज उपलब्ध
✻ लग्न ✻ वाढदिवस ✻ साखरपूडा ✻ बारसे ✻ स्वागत समारोह
सुसज्ज AC ऑडीटोरीयम
मिटींग, कॉन्फरन्स, सांस्कृतिक कार्यक्रम, स्नेहसंमेलन, प्रोडक्ट लॉंचिंग, राजकीय व सामाजिक सभा
✻ बुकिंगसाठी संपर्क: 73 9009 5009
आय.एम.ए. भवन, नविन लिंक रोड, कल्याण रोड, अ.नगर.



# नगरमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे १० एप्रिलला लोकार्पण

नगर – दिल्ली येथे सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात असलेल्या पुतळ्याच्या धर्तीवर नगर मध्ये भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा तयार करण्यात आला असून त्याचे लोकार्पण केंद्रिय मंत्री चिराग पासवान यांच्या हस्ते १० एप्रिल रोजी होणार आहे. या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणुन पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील उपस्थित राहणार आहेत. कार्यक्रमास महायुती व घटक पक्षाचे प्रमुख पदाधिकारी उपस्थित राहणार आहेत, अशी माहिती आमदार संग्राम जगताप यांनी पत्रकार परिषदेत दिली.

शहरात डॉ.आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा उभारण्यात यावा, यासाठी आंबेडकरवादी नेते व कार्यकर्त्यांनी वेळोवेळी मागणी करत पाठपुरावा केला होता. त्यास यश येऊन महापालिकेच्या माध्यमातुन मार्केट यार्ड चौकात पूर्वी असलेल्या अर्धाकृती पूतळ्याच्या जागी हा नवीन पूर्णाकृती पुतळा बसवण्यात येणार आहे. त्या ठिकाणी सुशोभिकरण करून १८ फूट उंचीचा चौथारा उभारण्यात आला आहे. त्या चौथाऱ्यावर १० फूट उंचीचा भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा पूर्णाकृती पुतळा बसवण्यात येणार आहे. हा पुतळा दिल्ली येथे सर्वोच्च न्यायालयाच्या आवारात असलेल्या पुतळ्या प्रमाणे पूर्णाकृती तयार करण्यात आलेला आहे. असा पुतळा दिल्ली नंतर अहिल्यानगर शहरात असणार आहे.

यावेळी बोलतांना आमदार जगताप म्हणाले, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी तयार केलेल्या संविधानाचा उपयोग सर्वसामान्य जनतेचे प्रश्न सोडवण्यासाठी होत आहे. पुतळ्याच्या माध्यमातून त्यांच्या विचारांचा वारसा पुढे घेऊन जाण्यात मदत होईल. यावेळी संभाजी भिंगारदिवे, सुरेश बनसोडे, अजय साळवे, सुमेध गायकवाड, रोहित आव्हाड, किरण दाभाडे, सुनिल क्षेत्रे, कौशल गायकवाड, सुनिल शिंदे, प्रा. जयंत गायकवाड, विशाल गायकवाड, विशाल भिंगारदिवे, संजय जगताप, सिद्धार्थ आढाव, माजी नगरसेवक प्रशांत गायकवाड, विजय गायकवाड, गौतमी भिंगारदिवे आदी उपस्थित होते.

### एक टन वजनाचा ब्रांझ धातूचा पुतळा

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुर्णाकृती पुतळ्यासाठी मुख्यत: ब्रांझ धातुचा उपयोग करण्यात आला आहे. ब्रांझ धातु बरोबरच अन्य पाच धातुचे मिश्रण या पुतळ्यासाठी उपयोगी आणले आहे. या पूर्णाकृती पुतळ्याचे वजन ८०० किलो असून पूर्ण फिटींग होईपर्यंत ते एक टनापर्यंत पोहचेल. या पुतळ्याचे शिल्पकार कोंढवा हवेली, पुणे येथील ऋषी आर्ट असून, पुतळ्यासाठी १६ लाख ७९ हजार रुपयांचा खर्च आला आहे तर चौथरा उभारणीसाठी ५५ लाख ७६ हजार २१७ रुपये खर्च आला आहे.

Fenesta
Better by Design
India`s No.1 Windows & Doors Brand
भारतातील नावजलेली फिनिस्टा कंपनीच्या
सर्व प्रकारचे uPVC आणि ॲल्युमिनियम खिडकी, दरवाजा, मिळण्याचे एकमेव अद्यावत शोरुम
CHANDAN GLASS
Shop No. 5, Venkatesh Prime, Near Ananddham, Ahilyanagar 414001. Mob. 9860119223 / 9823189592

सरपंच संतोष देशमुख हत्त्येच्या निषेधार्थ १३ एप्रिलला नगरमध्ये आयोजित

# महा जनआक्रोश मोर्चासाठी 'कोअर कमिट्यां'ची स्थापना

नगर – बीडचे मस्साजोग येथील सरपंच संतोष देशमुख व सोमनाथ सूर्यवंशी यांची अमानवी हत्या झाली. या हत्येत सहभागी असणाऱ्या सर्व आरोपींना फाशीची शिक्षा व्हावी, इतर आरोपींना सह आरोपी करावे, या मागणीसाठी अहिल्यानगर शहरात १३ एप्रिल रोजी काढण्यात येणाऱ्या सर्व धर्मीय, सर्व जातीय, सर्व पक्षीय महा जनआक्रोश मोर्चासाठी विविध कोअर कमिट्यांची स्थापना करण्यात आली आहे.

या मोर्चाच्या नियोजनासाठी ३१ मार्च रोजी कोहिनूर मंगल कार्यालयात बैठक झाली. यात ठरल्याप्रमाणे हा मोर्चा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून सकाळी १० वाजता सुरू होईल. तिथून तो कापडबाजार, नवीपेठ, चितळे रोड, दिल्लीगेट मार्गे रेसिडेन्शियल कॉलेज येथे समाप्त होऊन तेथे जाहीर सभा होईल.

३ एप्रिल रोजी पुन्हा नगरमध्ये महत्वपूर्ण बैठक




बैठकीत मोर्चासाठी विविध प्रकारच्या समित्या स्थापन करण्यात आल्या. त्यानुसार शहर कोअर कमिटी, सर्व तालुका कमिट्या, प्रचार साहित्य कमिटी, मंडप कोअर कमिटी, स्वच्छता कमिटी आदी अनेक कोअर कमिटी यावेळी निर्माण करण्यात आल्या आहेत.

तसेच ३ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता सर्व जाती, संघटनांच्या प्रतिनिधींची बैठक कोहिनूर मंगल कार्यालय येथे होणार आहे. ही बैठक संपल्यानंतर जिल्हाधिकारी व जिल्हा पोलीस अधीक्षक यांना मोर्चा आयोजनाबाबत निवेदन देण्यात येईल.

सर्वांनी आपापल्या तालुक्यात मोर्चाबाबत प्रचार, प्रसार व बैठका घेण्यास सुरुवात करावयाचे ठरले आहे, अशी माहिती सकल मराठा समाजाच्या वतीने देण्यात आली आहे.

MAHA DISCOUNT offer
An ISO 9001:2015 Certified
DiSHA COMPUTER INSTITUTE
Any Course Just in 1800/-
MS-OFFICE, ADV. EXCEL, TALLY, GST, 2D CAD, 3D CAD, CORELDRAW, PHOTOSHOP, ILLUSTRATOR, IN DESIGN, C PROGRAMMING, C++, CANVA, CHAT GPT, BANKING, TAXATION
Delhi Gate Branch: 1st Floor, 204, Anand Keshav Heights, Above Supekar Medical, Delhi Gate. 9371051769
Old ST stand Branch: 1st Floor, Amber Plaza, Near Lokmanthan Office, Near Maliwada Stand, Station Road. 9371151769
Pipeline Branch: Second Floor, Rucha Garden, Bhistbag Chowk, Pipeline Road. 7447761769

जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक

संस्थापक कै. आचार्य गुंदेचा

# नवा मराठा

फोन–२४१४१४१, २४१७७७७

भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा

email - navamaratha@gmail.com

## प्रदूषित शहरे... बनताहेत यमाचे मोहरे...

नुकेताच जागतिक वायू गुणवत्ता (स्विस एअर क्वालिटी टेक्नॉलॉजी) अहवालासंबंधी माहिती पाहिली आणि डोकं सुन्न झालं. जगातील सर्वाधिक २० प्रदूषित शहरांपैकी तब्बल १३ शहरं आपल्या भारतातील आहेत.

त्यातही चिंतेची बाब म्हणजे यात आसाम, मेघालयाच्या सीमेवरील 'बर्निहाट' व राजधानी दिल्ली टॉपवर आहेत. आणखी एक अत्यंत गंभीर गोष्ट म्हणजे सेंटर फॉर सायन्स एन्हायरणमेंट' यांच्या अभ्यासानुसार केवळ १२% शहरांचाच हवेचा दर्जा तपासला जातो. ८२% लोकसंख्या प्रदूषण देखरेख केंद्राच्या कक्षेतच नाही!

वायू प्रदूषणामुळे २००८ ते २०१९ या काळात ३६ लाखांना जीव गमवावा लागला. महाराष्ट्राची परिस्थितीही चिंताजनकच आहे. पुणे, ठाणे, मुंबई पट्टा सर्व प्रकारच्या प्रदूषणाने गुदमरत आहेत. पाणी, नद्या आपण सर्वच अक्षम्यपणे प्रदूषित करीत आहोत.

वाचनीय मननीय – प्रेरणादायी अक्षर धन – संकलन : "मुसाफिर"–९८२२०२०६९१



जवळपास सर्वच शहरं व गावातील नद्या प्रचंड अस्वच्छ, गढूळ व सांडपाणी, केमिकल्सनी डबकी बनली आहेत. सरकार ध्येयधोरणे आखतात पण आता सगळ्यांना मिळून समाजजागृती करावीच लागेल. मी यापूर्वीही सांगितल्याप्रमाणे विशेषतः डिजीटल माध्यमांनी दिवसातून किमान एकदा तरी यावर माहिती, चर्चा, डॉक्युमेंटरीज दाखवायला पाहिजे. ब्रेकिंग म्हणून त्याच त्या निरर्थक बातम्यांऐवजी (किमान त्यांच्यासह) यासारख्या जीवन मरणाच्या व राष्ट्र–समाजाच्या संरक्षणाच्या बातम्या दाखवाव्यात. नाही तर वाढलेले व यापुढेही वाढणारे प्रदूषण व शहरीकरण यमाला निमंत्रणे देणारे ठरतील.



ला पिनो'ज पिझ्झा व लॉर्ड पेट्रिक बर्गर या कंपनीची अहिल्यानगर शहरात फ्रांच्यायसी सुरवात झाली आहे.

## ला पिनो'ज पिझ्झा व लॉर्ड पेट्रिक बर्गर आता अहिल्यानगर शहरात उपलब्ध

नगर – भारतीय चवीने खास बनवण्यात येणारे ला पिनो'ज पिझ्झा व लॉर्ड पेट्रिक बर्गर या पूर्ण भारतात नवजलेल्या कंपनींची फ्रांच्यायसी आता अहिल्यानगरमध्ये सुरु झाली आहे. डी मार्ट समोर रेस्टॉरंट सुरु झाले आहे. गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर विधिवत पूजा करून हे रेस्टॉरंट सुरु झाले आहे. यावेळी राजेश बंसल, उद्योजक श्रीकृष्ण जोशी, उद्योजक पवन अग्रवाल, अंजू मित्तल व कुटुंबीय उपस्थित होते, अशी माहिती रेस्टॉरंटचे संचालक अंचीत बंसल यांनी दिली.

अधिक माहिती देताना चॅन्सी बंसल म्हणाल्या, लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वांनाच आवडणाऱ्या पिझ्झा व बर्गरची मोठी रेंज येथे उपलब्ध आहे. पिझ्झा बर्गर सोबत इतरही अनेक चवदार पदार्थ व कॅफे पेयांचा आस्वाद नगरकरांना येथे मिळणार आहे. व्हेज व नॉनव्हेज अशा दोन्ही प्रकारांमध्ये येथे पिझ्झा व बर्गरची मोठी रेज उपलब्ध आहे. व्हेज व नॉनव्हेजसाठी वेगवेगळे साहित्य व उपकरणे वापरण्यात येतात. खास भारतीय चवीने बनवण्यात येणारे पिझ्झा व बर्गर पूर्ण देशात नागरिकांच्या पसंतीस उतरले आहेत. नगर– मध्येही या रेस्टॉरंटला नागरिकांचा प्रतिसाद मिळत आहे.

इतर मोठ्या कंपनीच्या मानणे खूप कमी असूनही दर्जेदार चवीचे आहेत. यामध्ये देसी तडका वापरून पनीर मखानी पिझ्झा, पनीर बटर मसाला पिझ्झा आणि मखानी दो–प्याझा पिझ्झा यांचा समावेश आहे. याशिवाय नॉनव्हेजचेही विविध सर्व प्रकार उपलब्ध आहेत. या शिवाय दर बुधवारी आणि शुक्रवारी येथे बाय वन गेट वन फ्री ही ऑफरही ग्राहकांना मिळणार आहे. ला पिनो'ज पिझ्झा कंपनीच्या मोबाईलच्या ॲप द्वारेही घर बसल्या ऑर्डर करून होम डीलेव्हारी उपलब्ध आहे. तसेच पार्टी व समारंभासाठी मोठा हॉलही येथे उपलब्ध आहे, अशी माहिती हितेन बंसल यांनी दिली.

# रस्त्यांच्या कामांसंदर्भात उच्चस्तरीय बैठक; खासदार निलेश लंके यांनी घेतला आढावा



रस्ते आणि महामार्गांच्या कामांना गती देण्यासाठी आयोजित उच्चस्तरीय बैठकीत खा. नीलेश लंके यांनी विविध कामांचा आढावा घेतला.

नगर – अहिल्यानगर दक्षिण मतदारसंघात निवडणूकीदरम्यान दिलेल्या विकास कामांची पुर्तता करण्यासाठी विविध भागांतील रस्ते आणि महामार्गांच्या कामांना गती देण्यासाठी आयोजित उच्चस्तरीय बैठकीत खा. नीलेश लंके यांनी विविध कामांचा आढावा घेतला.

नगर येथे आयोजित करण्यात आलेल्या या बैठकीस महामार्ग प्राधिकरणाचे अधिकारी, तांत्रीक तज्ञ, अभियंते आणि स्थानिक लोकप्रतिनिधी उपस्थित होते.

या बैठकीत छत्रपती संभाजीनगर–पुणे ग्रीन फिल्ड महामार्ग, सुरत–चेन्नई महामार्ग, पैठण पालखी मार्ग आणि इतर महत्वाच्या रस्ते प्रकल्पांच्या प्रगतीचा आढावा घेण्यात आला. या प्रकल्पांमध्ये येणाऱ्या अडचणी, निधी वितरण, विविध प्रकारच्या परवाणग्या, तांत्रीक बाबी आणि जमीनींचे अधिग्रहण याविषयी सविस्तर चर्चा करण्यात आली. कामांमध्ये येणारे अडथळे दुर करून कामांना गती देण्यासाठी अधिकाऱ्यांना खा. लंके यांनी यावेळी ठोस सुचना दिल्या.

बैठकीस माजी नगरसेवक दीप चव्हाण, योगीराज गाडे, गिरीश जाधव, प्रकाश पोटे यांच्यासह राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाचे प्रकल्प संचालक वसंत पंधेकर, साईट इंजिनिअर ओंकार देवकर, कार्यकारी अभियंता शेवाळे, सर्व्हेअर मुजीफ सययद, महेश मिश्रा, निवासी अभियंता अलोक सिंग, शाखा अभियंता शोएब फकीर, उपविभागीय अभियंता अजित गायके, घटमल, राखाडे व इतर अधिकारी उपस्थित होते.

### महत्वाच्या प्रकल्पांवर चर्चा

राहुरी–बारगांव नांदूर–जांभळी–वावरथ–भोकरदरा–ढवळपुरी हा नगर–कल्याण महामार्गाला जोडणारा रस्ता, राहुरी येथे बायपास अथवा फ्लाय ओव्हर ब्रीज उभारणी, नगर शहरातील पत्रकार चौक ते सह्याद्री चौकादरम्यान फ्लाय ओव्हर ब्रीज, आढळगांव ता. श्रीगोंदा येथे रेल्वे ओव्हरब्रीज आदी महत्वाच्या विषयांवर यावेळी चर्चा करण्यात आली. पैठण–मोहरी–खर्डा या ५५ कि. मी. लांबीच्या पालखी मार्गाचे काम वारकऱ्यांसह शेतकऱ्यांसाठी अत्यंत महत्वाचे असल्याने हे काम गुणवत्तापुर्ण व वेळेत पुर्ण करण्याचे निर्देश यावेळी खा. लंके यांनी दिले.

### नियमित आढावा बैठक घेणार

काही प्रकल्पांमध्ये अडथळे येत असल्यास त्यासंदर्भात केंद्र सरकारकडे पाठपुरावा करून ते दुर करण्यात येतील. केंद्रीय रस्ते विकास मंत्री नितीन गडकरी यांच्यासोबत स्वतंत्र बैठकीचे आयोजन करण्यात येईल. कामे दर्जेदार व वेळेत होण्यासाठी नियमित आढावा बैठक घेण्याचा निर्णय यावेळी घेण्यात आला.

## गळफास घेत अल्पवयीन मुलीची आत्महत्या

नगर – राहत्या घरामध्ये पत्राच्या छताला असलेल्या लोखंडी पाईपला फेट्याच्या साह्याने गळफास घेऊन १४ वर्षीय अल्पवयीन मुलीने आत्महत्या केल्याची घटना बालिकाश्रम रोडवरील फुलारे पेट्रोल पंपाच्या समोर, राजभोग मिठाई दुकाना शेजारी ३१ मार्च रोजी सायंकाळी ७.३० वाजण्याच्या सुमारास घडली. तेजश्री सुरेश सोनवणे (वय १४) असे आत्महत्या केलेल्या मुलीचे नाव आहे.

मुलीने घरामध्ये गळफास घेतल्याचे निदर्शनास येतात तिचे वडील सुरेश महादेव सोनवणे यांनी तातडीने तिला उपचाराकरिता जिल्हा शासकीय रुग्णालयात दाखल केले. तेथे डॉक्टरांनी तिची तपासून करून उपचारापूर्वीच ती मयत झाल्याचे सांगितले. याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी जिल्हा शासकीय रुग्णालयाचे वैद्यकीय अधिकारी डॉ. खेडकर यांनी दिलेले माहितीवरून आकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

# नगर –दौण्ड रोडवर रेल्वे पुलाच्या कामामुळे वाहतूक मार्गात बदल

नगर – दौंड या मार्गावरील नगर बीड रेल्वे लाईनला ओलांडणीपुलाचे बांधकाम सुरु होत असल्याने कायनेटीक चौक ते अरणगाव बायपास या रोडवरील येणारी व जाणारी सर्व प्रकारच्या जड वाहतुक मार्गात १ एप्रिल ते १० एप्रिल दरम्यान बदल करण्यात आला असल्याची माहिती पोलिस अधीक्षक राकेश ओला यांनी दिली आहे.

रेल्वे उड्डाणपुलाच्या या बांधकामासाठी साईटच्या जवळ मोठमोठे गर्डर बनविण्यात आलेले आहेत. हे गर्डर बसविण्यासाठी मोठे क्रेन व ट्रेलर वापरण्यात येणार आहेत. कायनेटिक चौक ते अरणगाव बायपास रोड हा रहदारीचा असल्याने अपघात होवुन कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे १ एप्रिल रोजीचे सकाळी ८ ते १० एप्रिल रोजीचे रात्री ८ वाजे पर्यंत नगर – दौंड या मार्गावरील कायनेटीक चौक ते अरणगाव बायपास या रोडवरील येणारी व जाणारी सर्व प्रकारची जड वाहतुक खालील पर्यायी मार्गाने वळविण्यात आली आहे.

कायनेटीक चौकातुन दौंड रोडने अरणगाव बायपासकडे जाणारे वाहनांकरीता कायनेटीक चौक केडगाव, केडगाव बायपास, अरणगाव बायपास मार्गे इच्छित स्थळी जातील. अरणगाव चौकातुन कायनेटीक चौकाकडे येणारे वाहनांकरीता पर्यायी मार्ग अरणगाव बायपास केडगाव वायपास केडगाव कायनेटीक चौक मार्गे इच्छित स्थळी जातील. तसेच पुणेकडुन दौंड रोडला जाण्यासाठी कायनेटीक चौकात येणारे वाहनांकरीता पर्यायी मार्ग केडगाव बायपास, अरणगाव बायपास, दौंड रोड मार्गे इच्छित स्थळी जातील.या आदेशचे पालन करुन नागरीकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करण्याचे आवाहन पोलिस अधिक्षक राकेश ओला यांनी केले आहे.

## सोनु खान नजीर खान यांचे अल्पशा आजाराने निधन



नगर – अमितनगर केडगाव देवी रोड येथील रहिवासी सोनु खान नजीर खान (वय ३३) यांचे ३१ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर काटवन खंडोबा दफनभूमी येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, बहीण असा परिवार आहे.

## दत्तात्रय कुलट यांचे अल्प आजाराने निधन



नगर – बुरुडगाव येथील रहिवासी दत्तात्रय यशवंत कुलट (वय ४५) यांचे ३१ मार्च रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्यावर बुरुडगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे आई, पत्नी, मुलगा व २ विवाहित बहिणी असा परिवार आहे.

## डॉ.राजेंद्र मैड यांचे अपघाती निधन



श्रीरामपूर – वडाळा महादेव येथील संजीवनी क्लिनिकचे डॉ. राजेंद्र सिताराम मैड (वय ४९) यांचे वडाळा महादेव येथील काटे स्वामी आश्रम समोर अपघाती निधन झाले.

त्यांच्या पश्चात वडील, पत्नी, भाऊ, एक मुलगा, एक मुलगी, पुतणे असा परिवार आहे. सेवानिवृत्त गटशिक्षण अधिकारी सिताराम दामोधर मैड यांचे थोरले चिरंजीव, जनता हायस्कूलचे सेवानिवृत्त मुख्याध्यापक भागवत मैड (सर) यांचे पुतणे, वैभव मैड यांचे बंधू, डॉ.संचित भागवत मैड यांचे चुलत बंधू होत.



## हनुमान चालिसा पाठ

बुधवार दि. ०२/०४/२०२५
रात्री ८.३० ते १०.३०

**श्री दक्षिणमुखी हनुमान सत्संग मंडळ, सर्जेपुरा, अहिल्यानगर**
**महात्मा फुले मित्र मंडळ,** शिंदे मळा, नायरा पेट्रोल पंपाजवळ, बालिकाश्रम रोड, गिरीश शिंदे– ९९२१०४७००७, राहुल शिंदे– ९८२२९४४४९.

**मंगल भक्त सेवा मंडळ, मंगल दत्तक्षेत्र, एमआयडीसी, अहिल्यानगर**
**भारत सहकार मित्र मंडळ,** जय आनंद महावीर चौक, दाळमंडई, आडते बाजार, बंटी डापसे– ९७३०१६००५९.

**श्रीराम भक्त हनुमान सत्संग मंडळ (ट्रस्ट) श्रीराम मंदिर, नवीपेठ**
**बाळासाहेब मारुतीराव बोराटे,** माजी नगरसेवक, ब्राह्मणगल्ली, माळीवाडा.

**श्री संकटमोचन हनुमान सत्संग मंडळ, अहिल्यानगर**
**संतोष नानासाहेब लोंढे,** लोंढे मळा, अकोळनेर रोड, केडगाव

**श्री लक्ष्मीनारायण सत्संग मंडळ, सारडा गल्ली, गंजबाजार**
**एक के–१ सोसायटी मित्र मंडळ,** अकोलकर हॉस्पिटलच्या जवळ, आय.टी.आय. कॉलेजच्या समोर, बुरुडगाव रोड, मो. ९४२२२२६९८०१

# भरदिवसा बुरूडगाव रोडवर घरफोडी करणारे दोघे चोरटे पुणे येथून जेरबंद

### चोरीतील ८६ हजाराचा मुद्देमाल जप्त, स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई



बुरूडगावरोडवर दिवसा घरफोडी करणारे दोघे चोरटे पुणे येथून जेरबंद केल्यानंतर त्यांच्या समवेत स्थानिक गुन्हे शाखेचे पथक.

नगर – बुरुडगाव रोडवरील नक्षत्र लॉन जवळ भरदिवसा झालेल्या घरफोडीच्या गुन्ह्यातील दोघांना स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने पुणे जिल्ह्यातील वडगाव ब्रुदुक (ता.हवेली) येथे जेरबंद केले आहे. त्यांच्या कडून चोरीतील ८६ हजार ४०० रुपयांचा मुद्देमाल जप्त केला.

या बाबतची माहिती अशी की, २८ मार्च रोजी सकाळी ७.३० ते दुपारी ४ वाजण्याच्या दरम्यान राजकुमरी आयोध्या शर्मा, रा.साई आनंद अपार्टमेंट, बुरुडगाव रोड) यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात चोरट्यांनी तोडून घरातील सोने चांदीचे दागीने, दोन मोबाईल व रोख रक्कम चोरुन नेली होती. याबाबत कोतवाली पोलीस ठाण्यात घरफोडीचा गुन्हा दाखल करण्यात आला होता. या गुन्ह्याचा समांतर तपास करण्याचे आदेश पोलिस अधिक्षक राकेश ओला यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पो.नि.दिनेश आहेर यांना दिले होते. त्यानुसार पो.नि. आहेर यांनी स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस उप निरीक्षक तुषार धाकराव व पोलीस अंमलदार संदीप पवार, संतोष लोढे, गणेश लोंढे, फुरकान शेख, अमृत आढाव, प्रशांत राठोड, सारीका दरेकर व महादेव भांड यांचे पथक नियुक्त करून तपास सुरु केला.

आरोपींचा सीसीटीव्ही फुटेज व तांत्रीक विश्लेषणाच्या आधारे तपास करत असताना, त्यांना हा गुन्हा रवि रामकुमार सोलंकी, (रा.खुर्जा बुलंद शहर, उत्तरप्रदेश) याने त्याचे साथीदारासह केला.असून ते सध्या साई अपार्टमेंट, घुलेनगर, वडगाव बुद्रुक, ता.हवेली, जि.पुणे येथे असल्याची माहिती मिळाली. मिळालेल्या माहितीवरुन पथकाने घुलेनगर, वडगाव बुद्रुक, ता.हवेली, जि.पुणे येथे जाऊन संशयीत आरोपींचा शोध घेऊन रवि सोलंकी व दुष्यंत धिरेस यादव (वय २३, रा. बरसामई, जि.हाथरस, उत्तरप्रदेश) यांना ताब्यात घेतले. त्यांच्याकडे गुन्ह्यांचे अनुषंगाने विचारपूस केली असता त्यांनी नक्षत्र लॉन्स शेजारी दिवसा घरफोडी केल्याची माहिती दिली.

त्यांच्याकडे गुन्हयातील मुद्देमालाबाबत विचारपूस केली असता रवि सोलंकी याने गुन्हयात चोरी केलेले दोन मोबाईल व एक घडयाळ हे त्याची पत्नी हिस ठेवण्यासाठी दिले व गुन्हयातील सोने हे श्री.सिध्दनाथ ज्वेलर्स, वडगाव बुद्रुक यांना दिले असल्याची माहिती दिली. पथकाने स्नेहा रमेश सिंह यांच्या कडील दोन मोबाईल व एक घडयाळ व वडगाव बुद्रुक, येथील सोनाराकडून ७७ हजार ४०० रूपये किंमतीची ८.६०० ग्रॅम वजनाची सोन्याची लगड असा एकुण ८६ हजार ४०० रुपये किंमतीचा मुद्देमाल जप्त केला.

ताब्यातील आरोपीस गुन्ह्याचे तपासकामी कोतवाली पोलीस ठाण्यात मुद्देमालासह हजर करण्यात आले.

## मागील भांडणाच्या कारणावरुन एकास कोयत्याने बेदम मारहाण

नगर – मागील भांडणाच्या कारणावरुन मनात राग धरून चौघांनी एकास शिवीगाळ, दमदाटी करुन कोयत्याने व लाथाबुक्क्यांनी बेदम मारहाण केली. तसेच त्यांच्या हाताच्या बोटात असलेल्या ६ व ८ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या बळजबरीने काढून घेतल्याची घटना २१ मार्च रोजी रात्री दहा वाजण्याच्या सुमारास एमआयडीसी परिसरातील विक्रम शेवाळे चौक, नवनागापूर एमआयडीसी येथे घडली.

याबाबत बाळासाहेब नामदेव वाघ (वय ३८, मूळ रा. लोहगाव, ता.नेवासा हल्ली रा.रवींद्र बेल्हेकर यांच्या घरात, चेतना कॉलनी, नवनागापूर अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे की ते पान घेण्याकरिता रात्री दहा वाजण्याच्या सुमारास विक्रम शेवाळे चौकातील गणेश पान स्टॉल येथे गेले असताना तेथे गणेश आव्हाड (पूर्ण नाव माहित नाही), गणेश आव्हाड याचा मित्र (पूर्ण नाव माहित नाही) व इतर दोन अनोळखी इसम हे तेथे आले आणि मागील भांडणाच्या कारणावरुन मनात राग धरून गणेश आव्हाड याने बाळासाहेब वाघ यास शिवीगाळ दमदाटी करुन हातातील धारदार कोयत्याने त्यांच्या पाठीत व डाव्या हाताच्या कोपऱ्यावर मारून जखमी केले. तसेच वाघ यांच्या उजव्या हाताच्या बोटातील अंदाजे सहा ग्रॅम व आठ ग्रॅम वजनाच्या दोन सोन्याच्या अंगठ्या बळजबरीने काढून घेतल्या व अन्य तिघांनी त्यास शिवीगाळ दमदाटी करून लाथा बुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत बाळासाहेब वाघ गंभीर जखमी झाले. याप्रकरणी एमआयडीसी पोलिसांनी बाळासाहेब वाघ यांनी ३१ मार्च रोजी दिलेल्या फिर्यादीवरुन गणेश आव्हाड सह चौघांविरुद्ध ११९ (१), ११८ (१), ११५ (२) ३५२, ३५१ (२), ३, ५ प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली असून पुढील तपास पोलीस हवालदार चौधरी हे करीत आहे.

## १० एप्रिल रोजी जिल्ह्यातील सर्व कत्तलखाने व मांस विक्रीचे दुकाने बंद ठेवण्याचे प्रशासनाचे आदेश

नगर – भगवान महावीरस्वामी जन्म कल्याणक निमित्ताने १० एप्रिल रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व कत्तलखाने व मांस विक्री संबंधित सर्व प्रकारचे दुकाने बंद ठेवण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने काढले आहेत.

ॲनिमल वेल्फेअर बोर्ड ऑफ इंडियाचे एच ए डब्ल्यू आर सदस्य तथा मिशन सेफ विहारचे अध्यक्ष इंजिनिअर यश प्रमोद शहा यांनी महाराष्ट्र शासन तसेच अहिल्यानगर जिल्हाधिकारी कार्यालय यांना याबाबतीत महाराष्ट्र शासन निर्णय, तथा ॲनिमल वेलफेअर बोर्ड ऑफ इंडिया यांचे पत्र ईमेल द्वारे पाठवले होते. त्याला अनुसरून १० एप्रिल रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील सर्व कत्तलखाने व मांस विक्री बंद ठेवण्याचे आदेश जिल्हा प्रशासनाने जारी केले आहे. या आदेशाची कडक अंबलबजावणी करण्याबाबतचे संबंधित सर्व प्रशासन विभागाला पत्रक देखील जिल्हाप्रशासनाने तात्काळ जारी केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अहिल्यानगर, पोलीस अधीक्षक, अहिल्यानगर, आयुक्त, महानगरपालिका अहिल्यानगर, उपायुक्त पशुसंवर्धन, अहिल्यानगर, सर्व उपविभागीय दंडाधिकारी, सह आयुक्त. नगरपरिषद प्रशासन, जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर, तसेच सर्व तहसीलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी या सर्वांना जिल्हा प्रशासनाच्या वतीने ई–मेल द्वारे आपल्या संबंधित विभागांमध्ये कडक अंमलबजावणी करण्याचे आदेश जारी करण्यात आले आहे.

यासोबतच यश शहा यांनी अहिल्यानगर महानगरपालिका तसेच जिल्हा पोलीस प्रशासन, जिल्हा पशुसंवर्धन विभाग व संबंधित सर्व विभागांना देखील ई–मेल व फोन द्वारे जिल्हा प्रशासनाचे आदेश पत्र पाठवले आहे

## सोनानगर चौक येथील बेकायदेशीर हुक्का पार्लरवर पोलिसांचा छापा

नगर – हुक्का पार्लर चालविण्याचा परवाना नसताना लोकांना हुक्का पिण्यासाठी लागणारे साहित्य व साधने पुरवणाऱ्या हुक्का पार्लरवर तोफखाना पोलिसांनी छापा टाकून १ हजार २०० रुपये किमतीचा मुद्देमाल जप्त करून एकास ताब्यात घेतले. ही कारवाई सावेडी परिसरातील सोनानगर चौक येथील पत्राचा शेडमध्ये सुरु असलेल्या ब्रोकोड नावाच्या हुक्का पार्लरवर १ एप्रिल रोजी पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास केली.

या बाबतची माहिती अशी की तोफखाना पोलिसांना माहिती मिळाली की सोनानगर चौक येथे एका पत्राच्या शेडमध्ये ब्रोकोड हुक्का पार्लर सुरू आहे. अशी माहिती मिळालेली तोफखाना पोलीस पथक तात्काळ त्या ठिकाणी गेले असता पोलिसांची चाहूल लागताच तेथील काही इसम पाठीमागील दरवाजातून पळून गेले. तेथे असलेल्या एका तरुणास त्याचे नाव व पत्ता विचारला असता त्याने आयुष भीम भटराय (वय १८, रा.वाघ गल्ली, नालेगाव) असे असल्याचे सांगितले. तसेच त्याने येथे हुक्का पार्लर चालवला जात असल्याचे सांगितले. त्याच्याकडे हुक्का पार्लर चालवण्याच्या परवान्याबाबत विचारणा केली असता त्याने त्याच्याकडे परवाना नसल्याचे सांगितले. पोलिसांनी त्या पत्राच्या शेडची पाहणी केली असता ते शेड २० बाय १५ फूट लांबी रुंदीचे असून त्यामध्ये बसण्याकरिता सोफा व टेबलची मांडणी केलेली दिसून आली. टेबलवर हुक्का पिण्यासाठी काचेचे टीपॉय ठेवलेले दिसून आले तसेच हुक्का पिण्यासाठी लागणारे साहित्यही येथे मिळून आले. ते पोलिसांनी जप्त केले.

याप्रकरणी तोफखाना पोलिसांनी पो. हे. कॉ. सुरज वाबळे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून आयुष भटराव याच्या विरुद्ध सिगारेट व तंबाखूजन्य उत्पादने (जाहिरातीस प्रतिबंध आणि व्यापार वाणिज्य उत्पादन पुरवठा आणि वितरण विनिमय) अधिनियम २००३ चे सुधारित अधिनियम २०१८ चे कलम ४(अ) /२१ (अ) प्रमाणे गुन्ह्याची नोंद केली आहे.

# गृहिणी

## आरोग्य

### मानदुखीला पळवा

कधी कधी मानदुखी हा मोठा त्रास देऊ शकते. हळूहळू तो आपल्या दैनंदिन जीवनावर प्रभाव टाकतो. पण चिंता करण्याची आवश्यकता नाही. काठासन हे एक अत्यंत प्रभावी आसन आहे जे पाठीच्या मणक्याला लवचिकता आणते. हे मानदुखीच्या समस्येसाठी खूप उपयोगी आहे. त्याचप्रमाणे ध्यान हाही एक उत्तम उपाय आहे.

## पाककला

### क्रिस्पी उडीद वडा

**साहित्य** : एक वाटी उडीद डाळ, थोडीशी मूग डाळ, एक कांदा, दोन मिरच्या थोडे जिरे, कढीलिंब

**कृती** : रात्री उडीद व मूग डाळ एकत्र भिजत घालावे. सकाळी कमी पाण्यात सरबरीत वाटून घ्यावे. वाटुन झाल्यावर चमच्याने चांगले फेसून घेणे. म्हणजे वाटलेली डाळ हलकी होते. चवीपुरते मीठ, जिरे, कढीलिंब चिरुन मिरच्या बारीक चिरून व एक कांदा बारीक चिरून घालणे. कढईत तेल चांगले तापले की आच मध्यम करावी. हाताने किंवा चमच्याने गोल वडे टाकावेत. दोन्हीकडून खरपुस तळले गेले की बाहेर काढणे. पुढचा घाणा होईपर्यंत खाली काढलेले वडे गार होतात. मग ते हाताने हलकेच दाबून चपटे करावे व परत तळायला टाकावे. वडे आधीच तळलेले असल्याने लगेचच तळून होतात. नारळ पुदीन चटणी बरोबर सर्व्ह करावे.

## वास्तू

### आदर्श बेडरुमसाठी

* पलंगाच्या समोर आरसा किंवा दूरदर्शन नसावे. याचे कारण असे की बिछान्यात असताना प्रतिबिंब दिसू नये, कारण यामुळे घरगुती व्यत्यय आणि भांडणे होतात.

* बेडरुमच्या भिंती तटस्थ किंवा म ातीच्या टोनमध्ये रंगवल्या पाहिजेत, कारण ते सकारात्मक ऊर्जा पसरवतात. भिंती काळ्या रंगाच्या नसाव्यात.

## सल्ला

दोन वाट्या पोहे घेतले तर दीड वाटी कांदा वापरावा म्हणजे पोहे चिकट होणार नाहीत आणि पोह्यांचा लगदा होत नाही.

## सौंदर्य

स्क्रबिंग करण्यासाठी २ चमचे दह्यात १ चमचा कॉफी पावडर टाका. या मिश्रणाने चेहऱ्याची ५ ते ७ मिनिटे स्क्रबिंग करा. याने चेहऱ्याची आतपर्यंत स्वच्छता होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. २ एप्रिल २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, चैत्र शुक्लपक्ष, कृत्तीका ०८।५०, सूर्योदय ०६ वा. ३५ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : आर्थिक स्थितीत सुधारणा होईल. प्रशासकीय कामे पूर्ण होतील. नवीन कार्याचे स्वरूप बनविण्यासाठी वेळ उत्तम.

**वृषभ** : कौटुंबिक विषयांमध्ये काळजी सतावेल. नोकरदार व्यक्तींच्या कार्यात कसुर होईल.

**मिथुन** : आपल्या कौटुंबिक तणावांचा समस्यांचा प्रभाव आपल्या कार्यावर होईल.म हत्वाकांक्षा वाढतील.

**कर्क** : यथायोग्य विचार करून कामे कराल. कौटुंबिक विषयांसाठी वेळ उत्तम राहील. अधिकार क्षेत्रात स्थिती अनुकूल राहिल.

**सिंह** : बेपर्वाई आपणासमोर अनपेक्षित प्रश्न उभे करेल. आरोग्य बिघडण्याची शक्यता आहे. विवाहेच्छूकांचे विवाह जमतील. परदेशागमनाचे योग आहेत.

**कन्या** : दिवसाच्या सुरुवातीला काही मोठे कार्य करायची वेळ येऊ शकते पण नंतर आपल्या मनात अनेक प्रकारच्या काळज्या घर करू शकतील.

**तूळ** : मित्रांबरोबर सामुदायिक उपक्रम किंवा पिकनिकच्या रूपात दिवसाचा आनंद घेऊ शकता. आपल्या विचारांचा इतरांवर प्रभाव राहिल.

**वृश्चिक** : मानसिक सुख-शांतीचे वातावरण राहील. अनुकूल वार्ता मिळतील. नोकरीपेशा व्यक्तींसाठी उत्तम काळ आहे. मान-सन्मान वाढेल.

**धनु** : आज पैसे आणि बळाची विशेष भूमिका राहील. सामाजिक प्रतिष्ठा वाढेल. मागील उधारी वसुल होईल.

**मकर** : महत्वाच्या बातम्या मिळतील. नोकरीपेशा व्यक्तींना अनुकूल परिस्थिती आहे. भाऊबंद डोके वर काढतील.

**कुंभ** : प्रेम-प्रसंगात यश मिळेल. नोकरीपेशा व्यक्तींसाठी कामात स्थिती आरामदायक राहिल. आर्थिक व व्यापारिक मुद्द्यांबद्दल आपले विचार श्रेयस्कर ठरतील.

**मीन** : आपल्या प्रिय व्यक्तीबरोबर एकांतात वेळ घालवण्याची आपली इच्छा पूर्ण होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

## हसा आणि शतायुषी व्हा!

बायको : कोण होती ती

नवरा : मैत्रीण

बायको : काय म्हणाली?

नवरा : माझ्याशी लग्न केले असतेस तर मी पिशवी धरायला लावली नसती

बायको : इकडे आणा ती पिशवी, आजपासून तुम्ही आराम करायचा, कोणतेही काम करायचे नाही

नवरा : चालतयं की

## करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* उत्तरप्रदेश सरकारने झांसी रेल्वे स्टेशनचे नाव बदलून कोणते नाव ठेवले आहे?

– वीरांगना लक्ष्मीबाई रेल्वे स्टेशन

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

## शब्दगंध क्र. ७१४६ सौ.शैलजा कुलकर्णी




शब्दगंध क्र. ७१४५ चे उत्तर



**आडवे शब्द :-** १) जिज्ञासू; शोधक ४) कालच्या आदला किंवा उद्याच्या नंतरचा दिवस ६) टाळी ८) एक धान्य ९) अटीची भाषा १२) कथिल व शिसे यांचा मिश्र धातू १४) एक प्रकारची दारू १५) गव्हाचे कणीदार पीठ १७) साबण वगैरेचा षटकोनी तुकडा १८) केस विंचरायचे एक साधन १९) सावध रहा; खबरदार २१) नेहमी; हमेशा २२) उपहास; फजिती; हुर्यो २३) धोबी; रजक २५) वाकडा रस्ता २६) किरकोळ नसलेले; धाऊक

**उभे शब्द :-** १) चार रस्ते एकत्र येतात ते ठिकाण २) उसाचा सोललेला तुकडा; गंडेरी ३) पंजाबमधील एक नदी ४) विरजलेल्या दुधातले पाणी काढून त्यात मीठ वगैरे घालून केलेले खाद्य ५) दिनकर; भास्कर; रवि; सूर्य ७) झेंडा; निशाण १०) एखाद्याची बाजू घेणे; वकिली ११) या काचेत प्रतिबिंब दिसते १३) प्रशंसा; स्तुती १६) गोलाकार फिरणारा वारा; वातचक्र २०) स्वीकार; अंगावर घेणे; धान्याचे दर २१) मीठ नसलेले; पाणचट; २४) मजल; रेंज

# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : मानवास बोलणे शिकावयास दोन वर्षे लागतात परंतु काय बोलावे हे शिकण्यात संपूर्ण आयुष्य निघून जाते.

## मुलांसाठी मेडिकल जनरल नॉलेज

### दहन केल्यानंतर मनुष्याची हाडे पुर्णपणे का जळत नाहीत?

मृत्यू हे जीवनाचे अंतिम सत्य आहे आणि जे कोणीही टाळू शकत नाही. जो व्यक्ती जन्माला येतो, तो व्यक्ती कधी ना कधी मरण पावतो. आपल्या जवळच्या आणि प्रिय व्यक्तीला गमावण्याचं दुःख कोणीही व्यक्त करु शकत नाही. यामुळे त्या व्यक्तीवर दुःखाचा डोंगर कोसळतो. एखाद्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्याच्या आत्म्याला मुक्ती मिळण्यासाठी त्याच्यावर योग्य पद्धतीनं अंत्यसंस्कार होणे आवश्यक असते. प्रत्येक धर्मात माणसाच्या निधनानंतर अंत्यसंस्कार करण्याची पद्धती ही वेगळी असते. सर्वसामान्यपणे हिंदू धर्मात मृतदेहाला अग्नी दिला जातो. हिंदू धर्मात, जेव्हा एखाद्याचा मृत्यू होतो तेव्हा त्याच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार केले जातात. यावेळी मृतदेह चितेवर ठेवून अग्नी दिला जातो. यामुळे काही तासांत शरीरातील अवयवाची जळून राख होते. मुखाग्नी दिल्यानंतर पार्थिव शरीराच्या हाडांचीही राख होते.

यानंतर फक्त अस्थी शिल्लक राहतात. मृताच्या आत्म्याला शांती मिळण्यासाठी पार्थिव अनंतात विलीन झाल्यावर शिल्लक राहिलेल्या अस्थी एका मातीच्या भांड्यात जमा करून नदीमध्ये विसर्जित केल्या जातात. पण त्यावेळी पार्थिवाचा एक अवयव मात्र जळत नाही. तो तसाच राहतो. विशेष म्हणजे हे संशोधनातून सिद्ध झालं आहे.

पार्थिवाला ६७० ते ८१० अंश सेल्सिअस तापमानात मुखाग्नी दिल्यानंतर काही तासात शरीर नष्ट होते. मानवी शरीर संपूर्ण जळून जाण्यासाठी साधारणतः दोन ते तीन तासांचा कालावधी लागतो, असं संशोधनातून समोर आलं आहे. माणसाचे शरीर जळून राख झाले तरी त्याचे दात मात्र जळत नाहीत. पार्थिव जळाल्यानंतर शिल्लक राहिलेल्या अस्थींमध्ये तुम्ही दात हे अगदी सहज ओळखू शकता. यामागील कारण म्हणजे, माणसाचे दात क ॅल्शियम फॉस्फ ेटपासून तयार होतात. त्यामुळे दातांवर आगीचा काहीच परिणाम होत नाही. यामुळे संपूर्ण पार्थिव जळून खाक झाल्यानंतरही दात मात्र तसेच राहतात.

## खरा मित्र

रमेश आणि सुरेश असे दोन मित्र एका लहानशा गावात राहत होते. जवळच्या एका मोठ्या गावात मोठी जत्रा भरली होती. त्या गावी जायचा रस्ता जंगलातुन जात असे. त्यामुळे रमेश आणि सुरेश दोघांनी सोबत जायचे ठरवले.

जंगलातुन जात असताना त्यांना समोर अस्वल दिसले. रमेश ताबडतोब बाजूला एका झाडावर चढला. अस्वलाचे लक्ष त्यांच्याकडे गेले.

सुरेशला झाडावर चढता येत नव्हते. तो जमिनीवर निपचित पडला आणि मेल्यासारखे नाटक केले. अस्वल त्याच्या जवळ आले. तो श्वास रोखुन पडला होता. अस्वलाने त्याला सगळीकडुन हुंगून पाहिले. अस्वलाला त्याच्यात काही विशेष रस वाटला नाही. अस्वल तिथुन निघुन गेले. अस्वल दूर गेल्याची खात्री झाल्यावर रमेश झाडावरून खाली उतरला. त्याने सुरेशला गमतीने विचारले, काय रे ते अस्वल तुझ्या कानात काय सांगत होते?

सुरेश म्हणाला, त्या अस्वलाने मला मोठी ज्ञानाची गोष्ट सांगितली कि जो संकटकाळी सोडून जातो तो खरा मित्र नव्हे.

तात्पर्य : संकटकाळी जो कामी येईल तो खरा मित्र.

# रहमते दर्शन (भाग - १)



मेरी आँख अचानक खुल गई और मैं परमानंद का अनुभव करने लगा और सुबह होने तक इस दृश्य को याद करता रहा। मैंने सुबह उठकर, नहा-धोकर, हाथ जोड़कर प्रभु से प्रार्थना की, हे प्रभु! आप तो सर्वव्यापक हैं, सर्वज्ञाता हैं, सबके दुःख दूर करने वाले हैं। मैं आपको नहीं जान सकता, परन्तु आप तो मुझे जानते हैं। यदि आप इस संसार में हैं तो कृपया मुझे अपना दर्शन दें। यही मेरी आपके चरणों में विनम्र प्रार्थना है ।

२४ मई की रात को वही महापुरुष फिर स्वप्न में प्रकट हुए, परन्तु इस बार उनके बाल खुले नहीं थे। सिर पर सफेद पगड़ी थी। वे देखने में सिक्ख लग रहे थे। उन्होंने कहा, आप शराब छोड़ क्यों नही देते ? मैंने उत्तर दिया, ये मेरे से छुटती नहीं है। मैंने बहुत प्रयत्न करके देख लिया है।

अब मेरा जीवन पहले से बेहतर चलने लगा और मैं मन ही मन सोचता रहता था कि परमात्मा ने मेरी प्रार्थना सुन ली है और किसी महापुरुष को मेरी सँभाल के लिए भेज दिया है।

### उनका अपनापन

३० मई १९९२ के दिन मैं अपनी चाची से मिलने गया। वह कहीं जाने के लिए तैयार हो रही थी । मेरे पूछने पर उसने बताया, आज हमारे गुरु का भंडारा है। अगर तुम भी सत्संग में चलना चाहो तो चलो। इतना सुनकर मैं भी उनके साथ चल दिया ।

जब हम सत्संग स्थल (कृपाल बाग़, दिल्ली) पहुँचे तो उस समय महाराज राजिन्दर सिंह जी सत्संग कर रहे थे। उन्होने फ़रमाया, आज का दिन संत दर्शनसिंह जी महाराज की याद का दिन है। हमारी सबकी ज़िन्दगी में किसी न किसी रूप में महाराज जी ने हमारी बहुत सहायता की है।

तभी स्टेज पर लगे चित्रों पर मेरी नज़र पड़ी। जब दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज की तस्वीर को मैंने देखा तो मैं पहचान गया कि ये तो वही हैं जिन्होंने मुझे स्वप्न के दर्शन दिये थे। फिर क्या था, मेरी अवस्था परमानंद की सी थी कि अंत में उन्होंने मुझे अपने पास बुला ही लिया ।

मुझे वर्तमान सत्गुरु से १ जून १९९२ को नामदान भी मिल गया । यह सब उसी दयाल पुरुष संत दर्शनसिंह जी महाराज की अपार दया थी कि उन्होंने स्वप्न में दर्शन देकर मुझे अपने सपूत और उत्तराधिकारी के चरणों में लगा दिया ।

अब कभी भी जब मैं महाराज दर्शनसिंह जी नाम सुनता हूँ, तो एक विचित्र सी कशिश का मुझे अनुभव होने लगता है और मैं आनंद

विभोर हो उठता हूँ । महाराज जी का यह शेर मैं अक्सर गुनगनाता रहता हूँ :

नफ़स नफ़स मुझे लाजिम है
शुक्र का सजद: ।
किह मेरे दोस्त का अहसां हैं
जिन्दतगी मेरी ।।

– मताए-नूर (उर्दू गजल-१०)

(क्रमश:)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

इमारत की बुनियाद सबसे महत्वपूर्ण होती है, उसी तरह मूलाधार सबसे महत्वपूर्ण चक्र होता है। जब हम योग करते हैं तो हमें किसी और चीज से अधिक मूलाधार चक्र पर राजयोग या साधना का अभ्यास करना है। क्योकि अगर इसे सुदृढ़ ओर स्थिर कर लिया तो बाकी चक्रों पर नियंत्रण आसान हो जाता है। मूलाधार चक्र मजबूत हो तो जीवन हो या मृत्यु, आप स्थिर रहेंगे। रीढ़ के ऊपर से नीचे ये आखिरी मनके में बिंदु को देखो और कहते रहो मैं शान्त हूँ शान्त हूँ।

मूलाधार चक्र मजबूत होगा तो किसी भी क्षेत्र में शुरुआत करने और जोखिम उठाने की क्षमता स्वयं आपके पास आ जाएगी। अस्तित्व जब खतरे में होता है तो उसे बचाने का दायित्व मूल आधार चक्र का होता है। इस चक्र का मुख्य विषय काम वासना, लालसा और सनक में निहित है। शारीरिक रूप से मूलाधार काम वासना को, मानसिक रूप से स्थायित्व को, भावनात्मक रूप से इन्द्रिय सुख को और अध्यात्मिक रूप से सुरक्षा की भावना को नियंत्रित करता है। मूलाधार चक्र पेरिनियम में स्थित है। इस स्थान को कन्द कहा है जहां कुंडलिनी सर्पनी की तरह साढ़े तीन गांठें मारकर बैठी है।

### मूल आधार चक्र

मूल आधार चक्र ४

मेरुदंड के दो केन्द्र हैं पहला कुंडलनी (काम केन्द्र) है और दूसरा सहस्त्रार है। पहला सिरा पृथ्वी केन्द्र से जुड़ा रहता है। दूसरा केन्द्र आकाश अर्थात भगवान से जुड़ा रहता है। हमारी मानसिक शक्ति इन दो केन्द्रों में खर्च होती रहती है। मूल आधार केन्द्र से जुड़ेंगे तो सारी एनर्जी इसी में खर्च होती रहती है। हम धरती से जुड़े कार्य प्रजनन, भोजन, सम्पति, मान शान, वैभव में लगे रहेंगे तथा वासना के विचारों से डिस्टर्ब होते रहेगें। अगर इस एनर्जी को बचाना चाहते हैं तो हमें मनसा, वाचा, कर्मणा, पवित्रता का पालन करना होगा। संसार में यही सब से मुश्किल काम है। अपवित्र विचार क्यों आते हैं, इस का कारण यह है कि मूल आधार केंद्र अर्थात ज्ञानेइन्द्रिय पृथ्वी से जुड़ी हुई है और पृथ्वी अपनी चुम्बकीय शक्ति से विकारों को अपनी ओर खींचती रहती है। जिस से अपवित्रता के विचार चलते रहते हैं। अंतरिक्ष यात्रियों ने यह महसूस किया कि जैसे धरती के गुरुत्वाकर्षण से बाहर निकलते जाते हैं तो अपवित्रता के विचार कम होते जाते हैं। ऐसे ही जब हम अपने को आत्मा समझते हैं या परमधाम में परमपिता परमात्मा को बिंदू समझ कर याद करते हैं तो पृथ्वी की चुम्बकीय शक्ति क्षीण हो जाती है तथा स्थूल शरीर के अन्दर सूक्ष्म शरीर अर्थात मन को खींच नहीं सकती जिस से अपवित्रता के विचार नहीं उठते, इसलिये हम सहज ही पवित्रता पालन कर लेते हैं। अगर हम अपने आप को सदा ही आत्मा समझते रहें और परमात्म के बिन्दू रूप को याद करते रहें तो हम पृथ्वी के आकर्षण से मुक्त हो जायेगें और हम पांच विकारों को सहज ही जीत लेगें। हम कहीं भी जाये, कहीं भी रहें, कुछ भी काम करें हमें विपरीत लिंग के लोग प्रभावित नहीं कर सकते। अच्छे योगियों का अनुभव है कि वह समाधि अवस्था में अपने को धरती से ऊपर उठा हुआ महसूस करते हैं तथा चलते फिरते भी उनका शरीर हल्का महसूस होता है। इस का मूल कारण यह है कि योग से पृथ्वी की चुम्बकीय शक्ति का प्रभाव खत्म हो जाता है। जिस से योगी उड़ता हुआ महसूस करता है। अंतरिक्ष यात्री जब अंतरिक्ष में जाते हैं तो वह अपने यान में थोड़ा टेढ़ा हो कर बैठते हैं जिस से पृथ्वी का चुम्बकीय बल उन पर असर नहीं करता। अगर वह सीधा बैठे रहें तो पृथ्वी का चुम्बकीय बल उन की रीढ़ की हड्डी को तोड़ देगा।

यही कारण है कि गहरे योग की अवस्था में योगी आगे की ओर अपने आप झुकता जाता है। अगर वह न झुके तो उसका मेरुदंड टूट सकता है।

(क्रमश:)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# आयुर्वेदीय बालसंस्कार

पंचकर्मामुळे अनेकदा अगदी दुर्धर, असाध्य अशा व्याधी बऱ्या होतात. जेव्हा पाच-सात दिवसांसाठी ॲन्टिबायोटीक्स घेतली जातात त्या वेळी त्याचा दुष्परिणाम शरीरास विशेष जाणवत नाही. परंतु जेव्हा वारंवार जंतुसंसर्ग होतो किंवा जास्त काळ टिकून राहतो अशा वेळी ॲन्टिबायोटीक्स जास्त दिवस घ्यावी लागतात. तेव्हा त्याचे दुष्परिणाम दिसून येतात ॲन्टिबायोटीक्स जंतूंचा नाश करते त्यामुळे आजार बरा होतो. त्याचबरोबर मोठ्या आतड्यातील शरीरास चांगले असलेले उपकारक बॅक्टेरियाही त्यामुळे नष्ट होतात. त्याचे दुष्परिणाम शरीरावर होतात.

उदाहरणार्थ, जुलाब, मळमळ, उलट्या, तोंड येणे, केस गळणे, अशक्तपणा वाटणे. एखादी मोठी शस्त्रक्रिया करण्यास सांगितली असेल, तर त्याआधी पंचकर्म उपचार करून बघावेत उदाहरणार्थ, गर्भाशय निर्हरण करण्याआधी पंचकर्म उपचार करून बघावेत. याने आजारावर नक्कीच मात करता येते. कारण गर्भाशय स्त्रीच्या शरीराला अत्यंत उपयुक्त असा अवयव आहे. याची शस्त्रक्रिया केल्यास स्त्रीच्या शरीरांमध्ये हार्मोन्सचे असंतुलन होऊन अनेक त्रासदायक लक्षणे निर्माण होतात. चिडचिड, अंगातून गरम वाफा निघणे, अशक्तपणा, हातापायांची आग होणे, घाम फुटणे, नैराश्य वाटणे ही सर्व लक्षणे गर्भाशय निर्हरण शस्त्रक्रिया केल्यानंतर दिसून येतात. हे टाळण्यासाठी पंचकर्म उपचार व आयुर्वेदिक औषधी उपचार करून बघावेत. यासाठी प्रथमत: पंचकर्म म्हणजे काय, हे जाणून घ्या.

### पंचकर्म

आयुष: वेदः आयुर्वेदः।

ज्या शास्त्रामध्ये जीवनाविषयीचे ज्ञान सांगितले आहे, असे आयुर्वेद शास्त्र भारतीय संस्कृतीत उगम पावले आहे. पाश्चात्त्य देशांतसुद्धा मान्यताप्राप्त झालेले असे हे आयुर्वेद शास्त्र शरीराबरोबरच मनाचा विचार करते. त्याची महती सर्वदूर पसरली.

ती त्याच्या परिपूर्णतेमुळे, न होणाऱ्या दुष्परिणांमुळे व पंचकर्माच्या तत्काळ गुणकारी उपयुक्ततेमुळे. पंचकर्म म्हणजे शरीरशुद्धीचा मार्ग. शरीरात वाढलेल्या विकृत दोषांची (टॉक्झीन्स) शुद्धी होऊन विकृत दोष शरीराबाहेर गेले, तर शक्यतो औषधांची गरज पडत नाही. दोषशुद्धी म्हणजे रोगाच्या संप्राप्तीचा तत्काळ भंग करणे. रोगातून मुक्तता मिळणे. म्हणून पंचकर्म आजारी व्यक्तीबरोबरच निरोगी व्यक्तीनेसुद्धा करणे आवश्यक असते.

रोगाचे समूळ उच्चाटन –

स्वस्थस्य स्वास्थ्य रक्षणम्।
आतुरस्य व्याधि परिमोक्षः।।

स्वस्थ (निरोगी) माणसाच्या आरोग्याचे रक्षण करणे व रोग मुळापासून उखडून टाकून त्याच्या आरोग्याचे रक्षण करणे हे आयुर्वेदाचे प्रयोजन आहे. ते साध्य करण्यासाठी आयुर्वेदामध्ये दोन प्रकारच्या चिकित्सापद्धती सांगितल्या आहेत.'

(क्रमश:)

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर मोबाईल नं- ८७९३४००४००

# रसिक ग्रुपच्या उपक्रमांमुळे अहिल्यानगरची वेगळी ओळख निर्माण झाली

## विधान परिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांचे प्रतिपादन; रसिक गौरव पुरस्कारांचे समारंभपूर्वक वितरण

नगर – सामाजिक व सांस्कृतिक कार्यक्रम अहिल्यानगरमध्ये झालेच पाहिजे. यासाठीचा जयंत येलुलकरांचा पुढाकार कौतुकास्पद आहे. यामुळे आपले नगर शहर पुढे जात सामाजिक बांधलकी जपली जात आहे. असामान्य काम करणाऱ्यांना रसिक गौरव पुरस्कार दिल्याने त्यांच्या कार्याला अधिक प्रेरणा व प्रोत्साहन मिळणार आहे. रसिक ग्रुपच्या उपक्रमांमुळे अहिल्यानगरची वेगळी ओळख निर्माण झाली आहे. अशा जयंत येलुलकरांमागे सर्वांनी उभे राहावे, असे प्रतिपादन विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांनी केले.

नुकत्याच गुढीपाडव्यानिमित्त झालेल्या रसिकोत्सव सोहळ्यात विधानपरिषदेचे सभापती प्रा.राम शिंदे यांच्या हस्ते रसिक ग्रुपच्या वतीने देण्यात येणारे विविध पुरस्कारांचे समारंभपूर्वक वितरण झाले. यंदा पुण्याच्या श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती देवस्थानचे खजिनदार महेश सूर्यवंशी यांना धार्मिक, शैक्षणिक व आरोग्य क्षेत्रातील योगदानाबद्दल स्व.प्रदीप गांधी स्मृती गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

आ.संग्राम जगताप यांनी कोट्यावधी रुपयांचा निधी उपलब्ध करत शहरात मोठ्याप्रमाणात सुरु झालेल्या कामांमुळे शहराच्या विकासात मोलाची भर घातल्याबद्दल त्यांचा विशेष गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला.

अहिल्यानगर महानगरपालिकेचे आयुक्त यशवंत डांगे यांनी महत्त्वपूर्ण निर्णय घेत शहराचा चेहरामोहरा बदलण्यासाठी दिलेल्या योगदानाबद्दल व शहराच्या सांस्कृतिक क्षेत्राला चालना देत रखडलेल्या नाट्य संकुलच्या कामास गती दिल्याबद्दल त्यांचाही विशेष गौरव पुरस्काराने सन्मान करण्यात आला.



रसिक ग्रुपच्या उपक्रमांमुळे अहिल्यानगरची वेगळी ओळख निर्माण झाली.

यावेळी राजाभाऊ कोठारी, उद्योजक नरेंद्र फिरोदिया, क्रेडाईचे आशिष पोखरणा, अनिल पोखरणा, अश्विन गांधी, पेमराज बोथरा, डॉ.प्रकाश कांकरिया, सुनील मुनोत, शशीकांत गुळवे, विजय इंगळे उपस्थित होते.

आ.संग्राम जगताप म्हणाले, जयंत येलुलकर निस्वार्थी भावनेन उपक्रम राबवून अहिल्यानगरचा ऐतिहासिक वारसा व संस्कृती जपत आहे. रसिक ग्रुपच्या या उपक्रमांमुळे शहरात नवे चैतन्य आले आहे. आपापल्या क्षेत्रात काम करत सामाजिक क्षेत्रातही योगदान देणाऱ्यांचे कौतुक पुरस्काराच्या रूपाने रसिक ग्रुपने केले आहे. या पुरस्कारांनी माझ्यासह सर्वांना सामाजिक कामासाठी प्रोत्साहन मिळणार आहे

या कार्यक्रमात महाराष्ट्र साहित्य परिषदेचे कार्याध्यक्ष व व्याख्याते प्रा.मिलिंद जोशी यांचा साहित्य चळवळ वृद्धिंगत करत केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल त्यांना गौरव पुरस्कार देण्यात आला.

स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेचे पोलीस निरीक्षक दिनेश आहेर यांनी आपले कर्तव्य बजावत अनेक गुन्ह्यांचा शोध लावत गुन्हेगारांवर वचक ठेवत जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहण्यासाठी केलेल्या उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना गौरव पुरस्कार देण्यात आला.

उत्कृष्ट कल्पना शक्तीने मंडप सजावट करणारे गणेश भूतारे यांचाही गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आला.

सावेडीच्या जॉगिंग पार्क मधील झाडांची निगा राखत तेथील सौंदर्य वाढवून पर्यावरण क्षेत्रात निरपेक्षपणे काम करणारे जीवन खरात यांचाही सुप्रभात ग्रुपच्या वतीने सन्मान करण्यात आला.

प्रास्ताविकात जयंत येलूलकर म्हणाले, आपले नगर शहर सांस्कृतिक शहर म्हणून ओळखले जावे यासाठी गेल्या २२ वर्षांपासून ग्रुप हा सांस्कृतिक वारसा जपत काम करत आहे. या कामात अनेकांची साथ मिळत आहे. नगरमध्ये अनेक हिरे आहेत जे आपल्या कार्यकर्तृत्ववाने नगरचे नावलौकिक वाढवत आहेत. अशांचा गौरव करून त्यांना अधिक प्रोत्साहन देण्यासाठी रसिक गौरव पुरस्कार देत आहोत. या वर्षीच्या पुरस्कार्थींनी आपापल्या क्षेत्रात भरोव योगदान देत अहिल्यानगरचे नाव उंचावले आहे. या पुरस्कार वितरण समारंभांचे नियोजन ग्रुपचे तेजा पाठक, सुदर्शन कुलकर्णी, निखिल डफळ, समीर पाठक, प्रशांत अंतापेलू, श्रीकृष्ण बारटक्के, स्नेहल उपाध्ये, प्रसन्न एखे, बाळकृष्ण गोटीपामुल, तुषार बुगे, मीनाक्षी पाटील, शारदा होशिंग, ऋषिकेश येलुलकर, ओंकार अंतापेलु आदींनी केले.

# सारोळा कासार गावचा २ एप्रिलला वार्षिक यात्रोत्सव

नगर – नगर तालुक्यातील सारोळा कासार येथील हिंदू – मुस्लीम धर्मियांच्या ऐक्याचे प्रतिक असलेल्या हजरत निर्गुणशाह वली बाबांचा वार्षिक यात्रोत्सव २ एप्रिल रोजी साजरा होत आहे. तसेच ३ एप्रिल रोजी दुपारी ३ वाजेपासून नामांकित मल्लांच्या कुस्ती मैदानाचे आयोजन करण्यात आले आहे.

सालाबाद प्रमाणे गुढीपाडव्याच्या दिवशी ग्रामदैवत पूर्वमुखी हनुमान मंदिरात पूजन झाल्यानंतर हजरत निर्गुणशाह वली बाबांच्या दर्ग्यात यात्रोत्सवानिमित्त गावकारभारी व ग्रामस्थांची बैठक पार पडली आहे. या बैठकीत यात्रेचे नियोजन करण्यात आले. त्यानुसार चैत्र शुद्ध पंचमीला २ एप्रिल रोजी बाबांचा यात्रोत्सव व ३ एप्रिलला कुस्त्यांचे मैदान भरविण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. या कुस्त्यांच्या मैदानासाठी राज्य भरातून कुस्ती पटू हजेरी लावत असतात. ग्रामस्थ लोकवर्गणी जमा करून या कुस्तीपटूवर बक्षिसांचा वर्षाव करत कुस्ती मल्ल विद्येला प्रोत्साहन देत असतात. या कुस्ती मैदानाचा कुस्ती शौकीनांनी लाभ घ्यावा असे आवाहन यात्रा कमेटीच्या वतीने करण्यात आले आहे.

# नगरच्या वाडिया पार्क येथे २३ एप्रिल ते ४ मे दरम्यान भगवान महावीर कप नाईट टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धा

नगर – आदर्श व्यापारी मित्र मंडळ व मॉर्निंग क्रिकेट क्लबतर्फे वाडिया पार्क येथे २३ एप्रिल ते ४ मे दरम्यान भगवान महावीर कप २०२५ टेनिस बॉल क्रिकेट, धावणे, बॅडमिंटन आणि रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे. यानिमित्त फॉर्मचे अनावरण सी.ए मोहन बरमेचा, गिरीश अग्रवाल आणि चेतन बोगावत यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी आदर्श व्यापारी मित्र मंडळाचे संस्थापक माजी नगरसेवक संजय चोपडा, अध्यक्ष राजेंद्र तातेड, राजेंद्र गांधी, अजय गुगळे, डॉ. सचिन बोरा, अमित पितळे, लक्ष्मीकांत शेटिया, प्रीतम गुंदेचा, उमेश मंत्री, आनंद पितळे, वर्धमान मुनोत, राहुल शिंदे, सुयोग लुणिया, मयूर पितळे, सी.ए आनंद गांधी, प्रीतम पोखरणा, आनंद कटारिया, रुपेश कटारिया, रुपेश भंडारी, सचिन कटारिया, रितेश बोरा, अतुल शेटीया, आनंद नाहाटा, प्रफुल्ल मुथा, विकास सुराणा, प्रवीण शिंगवी, अजय कांबळे आदि उपस्थित होते.



वाडिया पार्क येथे होणाऱ्या भगवान महावीर कप नाईट टेनिस बॉल क्रिकेट स्पर्धेच्या फॉर्मचे अनावरण सी.ए मोहन बरमेचा, गिरीश अग्रवाल आणि चेतन बोगावत यांच्या हस्ते करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

सी.ए मोहन बरमेचा म्हणाले की, वाडिया पार्क येथे फ्लड लाईटच्या प्रकाशात भगवान महावीर क्रिकेट कपचा थरार नगरकरांना पाहण्यासारखा असतो. यावेळी समाजातील नागरिक उपस्थित राहत खेळाडूंना प्रोत्साहन देण्याचे काम केले जाते. वाडिया पार्कमध्ये आनंदाचे, उत्साहाचे वातावरण निर्माण होत असते. तसेच खेळाच्या माध्यमातून एकोपा निर्माण होत असतो. भगवान महावीर कप स्पर्धा ही नगरकरांसाठी एक पर्वणी असते असे ते म्हणाले.

गिरीश अग्रवाल म्हणाले की, धका–धकीच्या जीवनामध्ये मनुष्य आपल्या आरोग्याकडे अक्षरशः दुर्लक्ष करत असतात. मात्र भगवान महावीर कप स्पर्धेच्या माध्यमातून युवकांमध्ये खेळाची गोडी निर्माण होत असून व्यायामाकडे आकर्षित केले जाते. त्यामुळे आपले आरोग्य सदृढ व निरोगी राहण्यास मदत होते असे ते म्हणाले.

चेतन बोगावत म्हणाले की, आदर्श व्यापारी मित्र मंडळ व मॉर्निंग क्रिकेट क्लबचे युवक एकत्रित येत शहरात भगवान महावीर कप स्पर्धेच्या माध्यमातून खेळाडूंना हक्काचे व्यासपीठ निर्माण करून दिले जाते. या माध्यमातून खेळाडू आपल्या खेळाचे प्रदर्शन करत असतात असे ते म्हणाले.

वाडिया पार्क येथे भगवान महावीर कप उत्साहात होत असतो. यावर्षी क्रिकेट स्पर्धेबरोबरच ४०० मीटर धावणे, बॅडमिंटन व रस्सीखेच स्पर्धेचे आयोजन केले आहे. क्रिकेट खेळता येत नसणाऱ्यांना इतर स्पर्धेमध्ये भाग घेता येणार आहे. आय.पी.ए.ल च्या धर्तीवर क्रिकेट स्पर्धेचे आयोजन केले जात असून, १८ संघ सहभागी होणार आहेत. यामध्ये सुमारे ४०० खेळाडू खेळणार आहेत. या स्पर्धेमध्ये भगवान महावीर कप हे मानाचे पारितोषिक असून १ लाख ११ हजार १११ रुपये तसेच दुसरे पारितोषिक ५१ हजार रुपये तिसरे पारितोषिक ३१ हजार रुपये दिले जाणार आहे. तसेच प्रत्येक मॅचला (मॅन ऑफ द मॅच) (बेस्ट बॉलर) (बेस्ट फिल्डर) (बेस्ट बॅट्समन) आदी पुरस्काराने खेळाडूंना सन्मानित केले जाणार आहे. तसेच (मॅन ऑफ द सिरीज) चा देखील पुरस्कार दिला जाणार असल्याची माहिती मंडळाचे अध्यक्ष राजेंद्र तातेड यांनी दिली.

# समाजाला योग्य मार्गाने नेण्याचे काम साहित्यिक करतात आणि या नवोदित साहित्यिकांना पाठबळ देण्याचे काम 'शब्दगंध' करते

## व्याख्याते सीताराम काकडे यांचे प्रतिपादन

नगर – समाजाला योग्य मार्गाने नेण्याचे काम साहित्यिक करतात आणि या नवोदित साहित्यिकांना पाठबळ देण्याचे काम शब्दगंध करते. सोळा संमेलने यशस्वी करून शब्दगंधने आपल्या साहित्यिक कार्याचा ठसा अहिल्यानगरवासियांच्या मनामध्ये उमटवला आहे, असे मत ज्येष्ठ साहित्यिक, व्याख्याते प्रा.सीताराम काकडे यांनी व्यक्त केले.

शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्यच्या वतीने आयोजित सोळाव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या आभार सभेत ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बापूसाहेब भोसले हे होते तर विचारपीठावर ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते कॉ. बाबा आरगडे, नेवासा तालुका अध्यक्ष प्रा. डॉ. किशोर धनवटे, कार्यवाह शाहीर भारत गाडेकर, दिगंबर गोंधळी, अध्यक्ष राजेंद्र उदागे, संस्थापक सुनील गोसावी इत्यादी उपस्थित होते.

अध्यक्षपदावरून बोलताना बापूसाहेब भोसले म्हणाले की, शेवगावपासून सुरू झालेली ही साहित्यिक चळवळ आता खऱ्या अर्थाने राज्यस्तरावर पोहोचली असून अनेक नवोदित यामध्ये सहभागी होत आहे, ३०० पेक्षा अधिक नवोदितांची पुस्तके प्रकाशित करून त्यांना व्यासपीठ मिळवून देण्याचा प्रयत्न करण्यात आलेला आहे, ही अत्यंत प्रेरणादायी गोष्ट आहे. साहित्य संमेलना नंतर लगेच हिशोब देऊन यशस्वी करणाऱ्यांचे आभार हे माणूसपणाच लक्षण आहे.



शब्दगंध साहित्यिक परिषद, महाराष्ट्र राज्यच्या वतीने आयोजित राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाच्या आभार सभेत उपस्थित पाहुणे.

संस्थापक, सचिव सुनील गोसावी यांनी सोळाव्या राज्यस्तरीय शब्दगंध साहित्य संमेलनाचा हिशोब सादर करून पुढील दिशा स्पष्ट केली. यावेळी दिगंबर गोंधळी, प्रा. डॉ.अनिल गर्जे, राजेंद्र फंड यांनी मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक राज्य संघटक प्रा.डॉ. अशोक कानडे यांनी केले. तर शेवटी राज्य कार्यकारणी सदस्य सुभाष सोनवणे यांनी आभार मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शर्मिला गोसावी व स्वाती ठुबे यांनी केले.

यावेळी कार्याध्यक्ष ज्ञानदेव पांडुळे, प्राचार्य अशोक दौंड, भगवान राऊत, बाळासाहेब कोठुळे, जयश्री झरेकर, प्रा. डॉ.तुकाराम गोंदकर बबनराव गिरी, प्रशांत सूर्यवंशी, सुरेखा घोलप, वर्षा भोईटे, स्वाती आहिरे, सरला सातपुते, सुजाता पुरी, शामा मंडलिक, शर्मिला रणधीर,जयश्री मंडलिक, आरती गिरी, शितल सावंत, बाळासाहेब शेंदुरकर, संतोष कानडे, पी एन डफळ, आत्माराम शेवाळे, पांडुरंग रोडगे, विठ्ठल सोनवणे, माधव सावंत यांचा सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी ऋषिकेश राऊत, निखिल गिरी, दिशा गोसावी, हर्षली गिरी, कल्याणी सावंत, यज्ञज्या गिरी, अंजली खोडदे यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमास श्रीनिवास बोजा, सुनील धस, हर्षल आगळे, प्रसाद भडके, मकरंद घोडके, रामदास कोतकर, बाळासाहेब देशमुख, डॉ. सुदर्शन धस उपस्थित होते.

# लंडनमधील जलतरण स्पर्धेत साक्षी छाजेडचे नेत्रदीपक यश

नगर – कु.साक्षी छाजेड हिने लंडनमध्ये जलतरणात नेत्रदीपक कामगिरी करून भारताची मान उंचावली आहे. कु.साक्षी ही भारताची राष्ट्रीय पातळीवरील जलतरणपटू आहे. तिने जलतरणात अनेक विक्रम प्रस्थापित केले आहेत. वयाच्या तीन वर्षांपासूनच तिने स्पर्धात्मक जलतरणाचा श्रीगणेशा केला. तिने लंडनमधील लंडन ॲक्वाटिक्स सेंटर मध्ये झालेल्या स्विमथॉन युके या मानाच्या जलतरण स्पर्धेत सहभाग घेतला. ही २.५ किलोमीटर अंतराची स्पर्धा होती. अवघ्या ४६ मिनिटात तिने हे अंतर पार करताना १०० मीटरसाठी १.९ मिनिटाचा सरासरी वेग गाठला. यामुळे सर्वोत्कृष्ट स्पर्धक म्हणून तिने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.



ही जगातील सर्वात मोठी पूल–आधारित जलतरण निधी संकलन स्पर्धा आहे. लंडनमध्ये या स्पर्धेचा शुभारंभ १९८६ मध्ये झाला होता. १९८८ मध्ये ती राष्ट्रीय पातळीवर विस्तारली. आजपर्यंत सात लाखांहून अधिक स्पर्धकांनी या स्पर्धेत भाग घेतला आहे. लंडन ॲक्वाटिक्स सेंटर हे जगप्रसिध्द प्रतिष्ठित जलतरण केंद्र आहे. येथे २०१२ मध्ये ऑलिम्पिक स्पर्धा पार पडल्या होत्या.

लंडन ॲक्वाटिक्स सेंटरमधील जलतरणात बाजी मारून कु.साक्षी हीने कौतुकास्पद कामगिरी बजावली आहे. स्कायब्रीजचे मनोज छाजेड यांची ती कन्या आहे.



जेएमएफसीपदी निवड झाल्याबद्दल शेख शिरीन लालासहब यांचा सत्कार करण्यात आला.

# मुलींचे करियर घडविण्यात पालकांचे प्रोत्साहन व सासरचे पाठबळ महत्वाचे

## शिरीन शेख यांचे प्रतिपादन

नगर – मुलींना करियर करण्यात पालक, सासर यांची भूमिका महत्त्वाची असून याच दोन्ही शक्तींच्या बळावर मुली करियर मध्ये मोठी भरारी घेऊ शकतात, असे प्रतिपादन जेएमएफसीपदी नुकतीच निवड झालेल्या शेख शिरीन लालासहब यांनी त्यांच्या सत्कार प्रसंगी केले.

राज्य लोकसेवा आयोगाच्या मार्फत कनिष्ठ वर्ग न्यायमूर्ती पदासाठी घेतलेल्या जेएमएफसी परीक्षेचा निकाल नुकताच लागला आहे. त्यात नगरच्या शिरीन हिची निवड झाली आहे. शहरातील समाज बांधवांकडून तिचा सत्कार करण्यात आला व भावी कार्यास शुभेच्छा देण्यात आले.

या प्रसंगी ॲड. फारूक बिलाल, ॲड. हाफिज जहागीरदार, ॲड. जावेद शेख, ॲड. नुमेर शेख, ॲड. उमेर शेख, ॲड. नय्यरा शेख, आबीद खान, उबेद शेख व मोईन शेख, लालाभाई शेख, सी ए हारुण शेख, सी ए असलम शेख, सी ए ज़ावेद इनामदार, राजुभाई इनामदार, ससुर राजुभाई इनामदार, निसार इनामदार, इंजि. यूनुस शेख, हामिदभाई शेख उपस्थित होते.

प्रास्ताविक उबेद शेख यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. जबिन शेख यांनी केले. अतीक शेख यांनी आभार मानले.

## संत तुकाराम महाराज त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी वैकुंठगमन सोहळ्यानिमित्त आयोजित

# अखंड हरिनाम सप्ताहाचे ध्वजारोहण व मंडप उभारणीचा शुभारंभ

नगर – जगतगुरु तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी सदैह वैकुंठगमन सोहळ्यानिमित्त अखंड हरिनाम सप्ताह व संगीत गाथा पारायण सोहळा १५ एप्रिल ते २३ या कालावधीत नगर तालुक्यातील अकोळनेर येथे आयोजित करण्यात आलेला आहे. या सोहळ्याचे ध्वजारोह व मंडप उभारणीचा शुभारंभ ३१ मार्च रोजी सायंकाळी डॉ. सुजय विखे पाटील, आमदार शिवाजी कर्डिले, आमदार संग्राम जगताप, ह.भ.प माऊली महाराज कदम यांच्या हस्ते करण्यात आला.



संत तुकाराम त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी वैकुंठगमन सोहळ्यानिमित्त अकोळनेर येथे आयोजित अखंड हरिनाम सप्ताहाचे ध्वजारोहण व मंडप उभारणीचा शुभारंभ करताना माजी खासदार डॉ. सुजय विखे पाटील, आमदार शिवाजी कर्डिले, आमदार संग्राम जगताप, ह.भ.प माऊली महाराज कदम आदी.

अकोळनेर (ता. अहिल्यानगर) येथे १५ एप्रिल ते ३ एप्रिल दरम्यान येथे जगद्गुरु तुकोबाराय त्रिशतकोत्तर अमृत महोत्सवी सदेह वैकुंठ गमन सोहळ्याचे आयोजन सरपंच प्रतिक शेळके व ग्रामस्थांनी केले आहे. हा सोहळा श्रीगोंदा, पारनेर, राहुरी, नेवासा, पाथर्डी, शेवगाव, आष्टी या तालुक्यांच्या सहभागातून पार पडत आहे. या सोहळ्यात ५ हजार गाथा वाचक, ५०० टाळकरी, २५ मृदंग वादक, ५०० गावांचा तुकाराम महाराज अखंड पहारा, एक लक्ष भाविकास पुरणपोळी महाप्रसाद, १०८ युवकांच्या हस्तेच श्रीक्षेत्र देहू ते श्रीक्षेत्र अकोळनेर ज्ञानज्योत आगमन, आठ दिवस जगद्गुरु तुकोबाराय भव्य कृषी प्रदर्शन, श्री बालयोगी भगवान महाराज संगमेश्वर देवस्थान बीड अशा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमास हरिभक्त परायण श्रीनिवास महाराज, हरिभक्त परायण बंडातात्या कराडकर, हरिभक्त परायण महादेव महाराज राऊत, हरिभक्त परायण महंत भास्करगिरी महाराज, हरिभक्त परायण कान्होबा महाराज देहूकर, हरिभक्त परायण चैतन्य महाराज देगलूरकर, हरिभक्त परायण चंद्रशेखर महाराज देगलूरकर, हरिभक्त परायण जयंत महाराज बोधले, हरिभक्त परायण महाराज ज्ञानेश्वर माऊली कदम या महाराष्ट्रातील नामवंत कीर्तनकारांची कीर्तने होणार आहेत.

पालकमंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्या मार्गदर्शनाखाली होणार असलेल्या या सोहळ्याचे स्वागताध्यक्षडॉ. सुजय विखे पाटील, आमदार शिवाजीराव कर्डिले, आमदार संग्राम जगताप, आमदार काशिनाथ दाते आहेत. तसेच या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून पद्मश्री अण्णा हजारे व पद्मश्री पोपटराव पवार उपस्थित राहणार आहेत. सात दिवस विविध धार्मिक कार्यक्रमाचे आयोजनही यावेळी करण्यात आले असल्याचे ज्ञानेश्वर माऊली कदम, सरपंच प्रतिक शेळके यांनी सांगितले.

# आनंदऋषीजी हॉस्पिटलमध्ये रुग्णांचे आरोग्य जपले जाते

## उद्योजक किरण रांका यांचे प्रतिपादन; दुबिर्णीद्वारे शस्त्रक्रिया तपासणी शिबीर : महिनाभरात ४४४४ रुग्णांची तपासणी

नगर – आनंदऋषीजी हॉस्पिटलध्ये रुग्णांची मानसिकता समजावून घेऊन त्यांच्या आजाराने योग्य ते निदान करून उपचार केले जातात. रूग्णाचे आरोग्य जपले जाते, असा विश्वास रांका ज्वेलर्सचे किरण रांका यांनी व्यक्त केला.



राष्ट्रसंत आचार्यश्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या ३३ व्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित 'दुबिर्णीव्दारे शस्त्रक्रिया' या मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे उद्‌घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले.

राष्ट्रसंत आचार्यश्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या ३३ व्या स्मृतीदिनानिमित्त आयोजित 'दुबिर्णीव्दारे शस्त्रक्रिया' या मोफत आरोग्य तपासणी शिबीराचे उद्‌घाटन दीपप्रज्वलनाने करण्यात आले. तेव्हा ते बोलत होते. यावेळी सुर्यकांत रांका, नारंगीबाई शिंगवी, सौ.अनिताताई रांका, सौ.प्रीतम रांका, तज्ञ डॉ. लॅप्रोस्कोपिक सर्जन डॉ.भास्कर जाधव, डॉ.आर.एन.पांडे, डॉ.राहुल कांडेकर, डॉ.रविंद्र मुथा, डॉ. हिरल चौधरी, संतोष बोथरा, सतिष लोढा, माणकचंद कटारिया, अनिल मेहेर आदि उपस्थित होते. डॉ.आशिष भंडारी यांनी स्वागत केले.

उद्योजक किरण रांका पुढे म्हणाले, जैन सोशल फेडरेशनचे कार्यकर्ते, हॉस्पीटलमधील तज्ज्ञ डॉक्टर्स, नर्सेस, कर्मचारी या सर्वांचेच आपलेपणाचे सहकार्य रूग्णाला भावते. या शिबिर आयोजनात आमच्या रांका परिवाराला खारीचा वाटा मिळतो, हे आमचे भाग्यच आहे. यापुढेही शिबिराच्या आयोजनात सहभाग देत राहू, अशी ग्वाही देतो.

प्रास्तविक करताना संतोष बोथरा म्हणाले, रुग्णांना जीवनदान देण्याचे कार्य हॉस्पीटलच्या माध्यमातून सुरु आहे. आचार्य श्री आनंदऋषीजी म.सा. यांच्या आशीर्वादाने आणि प्रबुद्ध विचारक आदर्शऋषीजी म.सा. यांच्या मार्गदर्शनाने वैद्यकीय सेवा सुरू आहे. अत्यल्प दरात अद्ययावत मशिनरी व सुविधांसह येथील सेवा दानशूर व्यक्तींच्या योगदानामुळे दिली जात आहे. मागील एक महिन्यापासून सुरु असलेल्या या शिबीरामध्ये ४४४४ रुग्णांची तपासणी करण्यात येऊन आवश्यक त्या रुग्णांवर शस्त्रक्रिया करण्यात आल्या. समाजसेवेचे हे व्रत असेच पुढेही चालू राहिल.

यावेळी तज्ञ डॉ.आर.एन.पांडे म्हणाले, रुग्णांची सेवा आमच्या हातातून घडत आहे, हे आमचे भाग्य आहे. हॉस्पिटलमध्ये अनेक शिबीरे आयोजित करण्यात येतात. या शिबीरात चांगली सेवा दिली जात असल्याने असंख्य रुग्ण येतात या हॉस्पिटलचा नावलौकीक संपुर्ण जगात आहे. आम्ही डॉक्टर्स सुद्धा रुग्णांना चांगले मार्गदर्शन करतो. त्यामुळे रुग्णांना एक विश्वास मिळातो. तो संपुर्ण बरा होतो, असे सांगून शिबीरातील शस्त्रक्रियांची त्यांनी माहिती दिली.

शिबीरात दुबिर्णीव्दारे शस्त्रक्रिया (बिनाटाका) – लॅप्रोस्कोपी पोटावरील जागेचे, बेंबीचे ऑपरेशन व जांघेतील हार्नियाची शस्त्रक्रिया, पित्ताशय काढणे, स्त्रीयांची गर्भाशयाची पिशवी काढणे (हिस्ट्रोक्टॉमी), स्टॅपलर, लेझर पाईल्स शस्त्रक्रिया, ॲपेडिक्स ऑपरेशन, लॅप्रोस्कोपी स्त्रीयांचे बिजांडपोशावरील गाठी शस्त्रक्रिया, स्त्रीयांचे वंध्यत्वाची तपासणी करीता गर्भनलिकेची ट्युबल पेटेन्सी, लॅप्रोस्पोपी स्त्रीयांचे कुटूंब नियोजन शस्त्रक्रिया तपासणी करुन मार्गदर्शन करण्यात आले. या मोफत तपासणी शिबीरात १२७ जणांची तपासणी केली. सुत्रसंचालन अनिल मेहेर यांनी केले. सतिष लोढा यांनी आभार मानले.



अहिल्यानगर येथील आरोग्य आरोग्य सदन या नवीन हॉस्पिटलचे उद्‌घाटन करताना जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पा.,आ. संग्राम जगताप, आ. शिवाजीराव कर्डिले आदि.

# आरोग्य सदन हॉस्पिटलमुळे नगरच्या वैभवात भर

## पालकमंत्री राधाकृष्ण विखे पा. यांचे प्रतिपादन

नगर – वाढत्या शहरीकरणाबरोबरच शहरातील मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटलची ही संख्या वाढवावी लागणार आहे. सावेडीसारख्या ठिकाणी आरोग्य सदन हॉस्पिटलमुळे नगरच्या वैभवात आणखीनच भर पडणार असल्याचे जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

नगर – मनमाड रोडवरील आरोग्य सदन हॉस्पिटलच्या उद्‌घाटन प्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आ. संग्राम जगताप तर प्रमुख पाहुणे म्हणून आ.शिवाजीराव कर्डिले होते.

यावेळी बोलताना आ. जगताप असे म्हणाले की, डॉक्टरांच्या गोड बोलण्यामुळे अर्धा आजार पळून जातो. या हॉस्पिटलमध्ये माफक दरात सेवा उपलब्ध व्हावी.

आ. शिवाजीराव कर्डिले यांनी सर्व तज्ञ डॉक्टर एकाच ठिकाणी उपलब्ध असल्याने रुग्णांची चांगली सोय होणार आहे.


कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. धनंजय वारे व डॉ. महेश जरे यांनी केले. स्वागत डॉ. साईप्रसाद शिंदे व डॉ. राहुल कांडेकर यांनी केले. डॉ. प्रशांत काळे व डॉ. संकेत काळपांडे यांनी आभार मानले.

हॉस्पिटलची संपूर्ण माहिती डॉ. दिनेश पाटोळे यांनी सांगितली. कार्यक्रमात नाशिक, छत्रपती संभाजीनगर, पुणे, सोलापूर व नगरमधील सर्व स्तरावरील उपस्थित होते.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी डॉ. नितू काळपांडे, डॉ.आरती वारे, डॉ. अश्विनी जरे, डॉ. स्नेहा शिंदे, डॉ. मीनल काळे, डॉ. गायत्री कांडेकर, डॉ. रवीकांत पाचारणे, डॉ. निलेश भुसारी यांनी परिश्रम घेतले.

# भगवान महावीर जयंतीनिमित्त खुल्या निबंध स्पर्धेचे आयोजन

नगर – जैनधर्मीय २४ वे तीर्थंकर भगवान महावीर स्वामी जयंती निमित्त



नवीपेठमधील रोहित कॉस्मेटिक्सतर्फे खुल्या निबंध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे, अशी माहिती संचालिका सौ. राणी मुथा यांनी दिली.

त्या म्हणाल्या, भगवान महावीर स्वामींनी दिलेले संदेश आजच्या संगणकयुगातही उपयुक्त ठरणारे आहेत. कोणालाही न दुखावता जगण्याचा आनंद घेण्यास सहाय्य करणे म्हणजे पुण्य कार्य करणे होय. जगा आणि जगू द्या, हा जैन धर्मातील भगवान महावीर स्वामींचा संदेश आजही प्रभावित करतो.

निबंध स्पर्धेत सहभागी होऊ इच्छिणारे स्पर्धकांनी स्वतः विचार करत निबंध स्वअक्षरात ७०० शब्दापर्यंत लिहिणे अपेक्षित आहे. स्पर्धेसाठी भगवान महावीरांचे संदेश आजच्या संगणक युगातही उपयुक्त हा विषय ठेवण्यात आला आहे. स्वलिखित निबंध ८ एप्रिल पर्यंत रोहित कॉस्मेटिक्स, नवीपेठ, अहिल्यानगर येथे सिलबंद पोहोच करावेत. परिक्षकांचा निर्णय अंतिम राहिल. प्रथम तीन आणि दोन उत्तेजनार्थ अशी एकूण पाच बक्षिसे काढली जातील. स्पर्धेसाठी प्रवेश शुल्क नाही. ही स्पर्धा सर्वधर्मीयांसाठी खुली ठेवण्यात आली आहे, असे शरद मुथा यांनी सांगितले.

शहरातील युवती आणि गृहिणींना दर्जेदार सौंदर्य प्रसाधन उपलब्ध करून देणारे रोहित कॉस्मेटिक्स १७ वा वर्धापनदिन अक्षय तृतीयेला साजरा करताना भगवान महावीर स्वामींच्या निबंध स्पर्धांचे आयोजन करत आहे, असे शरद मुथा व सौ.राणी मुथा यांनी सांगितले.

# विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासाकरिता शाळेत स्पर्धा गरजेच्या

## विक्रांत मोरे यांचे प्रतिपादन

नगर – शाळेच्या जीवनात विद्यार्थ्यांना विविध स्पर्धामध्ये सहभाग घेऊन यश मिळवण्याची सवय लागायला हवी कारण शाळेतील विविध प्रकारच्या स्पर्धांमधूनच विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होत असतो, असे प्रतिपादन छावणी परिषद अ.नगरचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांनी केले.

छावनी परिषदेच्या पीएमश्री डॉ. बाबासाहेब आंबेडकर शाळा व नूतन माध्यमिक विद्यालय भिंगार येथे नुकताच विविध स्पर्धांचा वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा पार पडला. यावेळी ते बोलत होते.

कार्यक्रमास छावनी परिषदेचे मनोनित सदस्य वसंत राठोड, प्राध्यापक गिरीष कुकरेजा, मुख्याध्यापक संजय शिंदे, व्यवस्थापन समिती सदस्य अशोक शेलार, पूजा साबळे तसेच शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.



यशस्वी विद्यार्थ्यांना पारितोषिके प्रदान करताना छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे, वसंत राठोड, गिरीष कुकरेजा, संजय शिंदे, अशोक शेलार, पूजा साबळे, सुभाष भारूड, संजय हजारे आदी.

## पीएमश्री छावनी परिषद शाळेत विविध स्पर्धांचा बक्षीस वितरण

विद्यार्थ्यांनी अभ्यासाबरोबरच विविध कला शिकायला हव्यात, मैदानी खेळ खेळायला हवेत, तंत्रज्ञानाचा उपयोग आपल्या वैयक्तीक विकासाकारीता करायला हवा, भविष्यातील प्रत्येक आव्हानाचा सामना करण्याकरिता मुलींनीही धाडसी बनायला हवे, प्रत्येक मुलीमध्ये धाडसाने मार्गक्रमण करण्याची जिद्द निर्माण व्हायला हवी असे विक्रांत मोरे यांनी बोलताना सांगितले.

यावेळी बोलताना छावणी परिषद सदस्य वसंत राठोड म्हणाले, डॉ.बाबासाहेब आंबेडकर शाळेचा पीएमश्री योजनेत समावेश झाल्यामुळे शाळेचा भौतिक विकासा बरोबरच गुणवत्ता विकास होणार आहे. त्यामुळे नजीकच्या काळात ही शाळा परिसरात नावलौकिक प्राप्त करेल. शाळेत राबवले जात असलेले उपक्रम विद्यार्थ्यांच्या विकासाकरिता महत्वाचे आहेत. शिष्यवृत्ती परीक्षांमधील शाळेचा निकाल निश्चित कौतकास्पद आहे.

या वेळी बोलताना मुख्याध्यापक संजय शिंदे यांनी शाळेत राबवल्या जात असलेल्या विविध उपक्रमांची माहिती दिली. पारितोषिक वितरण कार्यक्रमात शाळेतील २५८ विद्यार्थ्यांना बक्षिसे व प्रमाणपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.

कार्यक्रमाचे सुत्रसंचालन महेश भगत व संजय हजारे यांनी तर प्रास्ताविक स्पर्धा संयोजक सुभाष भारूड, परिचय सोन्याबापू लबडे यांनी तर आभार स्नेहल लवांडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी सायली लेंडे, सगिर शेख, जी.आय शेख, मनीषा साठे, महेश मोहिते, सीमा चोभे, यादव मॅडम, प्रियंका पोकळे, वर्षा भारूड, प्रशांत आठवाल यांनी कष्ट घेतले.



नेप्ती येथे मुस्लिम समाजाची रमजान ईद (ईद–उल–फित्र) उत्साहात साजरी करण्यात आली.

# नेप्तीत ईद मिलन कार्यक्रमातून हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन

## आ. काशीनाथ दाते यांनी घेतला शीरखुर्माचा आस्वाद; गावाच्या विकासासाठी धार्मिक ऐक्य महत्त्वाचे

नगर – नेप्ती (ता. नगर) येथे मुस्लिम समाजाची रमजान ईद (ईद–उल–फित्र) उत्साहात साजरी करण्यात आली. गावातील मुस्लिम बांधवांच्यावतीने ईद मिलन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सर्व हिंदू समाजबांधवांनी सहभागी होवून मुस्लिम बांधवांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. या ईद मिलन कार्यक्रमास आ. काशीनाथ दाते यांनी देखील भेट देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या.

सकाळी शाही मस्जिदच्या मैदानावर मुस्लिम बांधवांनी रमजान ईदची सामुदायिक नमाज अदा केली. मौलाना मुनीर सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली नमाज पठण करून देशामध्ये शांतता, सुख, समृद्धी व धार्मिक एकात्मतेसाठी प्रार्थना करण्यात आली. संध्याकाळी गावात ईद मिलनच्या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमात सर्व हिंदू–मुस्लिम बांधवांनी एकत्र येऊन धार्मिक एकात्मतेचे दर्शन घडविले. यावेळी सर्व समाजातील बांधवांनी शीरखुर्माचा आस्वाद घेतला. रविवारी झालेला गुढी पाडवा व सोमवारी झालेल्या ईदचा उत्साह गावात दिसून आला. उपस्थितांनी एकमेकांना भेटून ईदच्या व पाडव्याच्या शुभेच्छा दिल्या.

आ. काशीनाथ दाते म्हणाले की, गावा–गावातील धार्मिक एकात्मता भारतीय संस्कृतीने जोडली गेलेली आहे. सर्व हिंदू– मुस्लिम बांधव रमजान ईद असो किंवा दिवाळी एकमेकांच्या सण–उत्सवात सहभागी होत असतात. गावाच्या विकासासाठी धार्मिक ऐक्य महत्त्वाचे आहे. नेप्तीत ईद मिलनच्या कार्यक्रमातून धार्मिक एकात्मतेचा संदेश दिशादर्शक असल्याचे त्यांनी सांगितले.

यावेळी उद्योजक दिलीप दाते, बापूसाहेब सोनवणे, माजी उपसरपंच फारुख सय्यद, माजी जिल्हा परिषद सदस्य अरुण होळकर, माजी सरपंच दिलीप होळकर, दादू चौगुले, रामदास फुले, प्रा. एकनाथ होले, अंबादास पुंड, अशोक जपकर, मुनीर सय्यद, गुलाब सय्यद, जमीर सय्यद, जावेद सय्यद, सलीम सय्यद, बाबूलाल सय्यद, आयुब सय्यद, वाजिद सय्यद, उमर सय्यद, सिकंदर शेख, नौशाद शेख, आसिफ सय्यद, हुसेन सय्यद, मुक्तार सय्यद, रमीज सय्यद, परवेज सय्यद, अरबाज सय्यद, नवेद सय्यद, इम्रान सय्यद, रफिक सय्यद, संतोष चहाळ, सोन्याबापू कानडे, रऊफ सय्यद, समीर सय्यद, युनूस सय्यद, वसिम सय्यद, कय्यूम सय्यद आदी उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी नाले हैदर यंग पार्टी व दोस्ती तरुण मंडळाच्या कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

# हिंदू बांधवांच्यावतीने नेप्ती येथे इफ्तार पार्टी

## हिंदू मुस्लिम बांधवांनी एकत्रित येत आपली परंपरा संस्कृती जोपासण्याचे काम केले : शिवाजी गाडेकर

नगर – नगर तालुक्यातील नेप्ती गावातील हिंदू मुस्लिम बांधव वर्षभर सण, उत्सव, धार्मिक कार्यक्रम एकत्रित येत मोठ्या उत्साहात साजरे करत असतात. रमजान महिना हा मुस्लिम बांधवांचा पवित्र सण म्हणून ओळखला जात असून, याला धार्मिकतेचे खूप मोठे महत्त्व आहे. या महिन्यांमध्ये मुस्लिम बांधव उपवास धरत असून रमजान उपासाची सांगता इफ्तारणे होत असते. यासाठी कल्याण रोडवरील सागर भेळचे संचालक शिवाजी गाडेकर, सागर गाडेकर यांच्यावतीने मस्जिदमध्ये मुस्लिम बांधवांसाठी इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते. यावेळी हिंदू मुस्लिम बांधवांनी एकत्रित येत आपली परंपरा संस्कृती जोपासण्याचे काम केले.



नेप्ती येथे हिंदू बांधवांच्यावतीने मस्जिदमध्ये इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते.

नगर तालुक्यातील नेप्ती येथे हिंदू बांधवांच्यावतीने मस्जिदमध्ये इफ्तार पार्टीचे आयोजन केले होते.

यावेळी जिल्हा परिषदेचे माजी सदस्य अरुण होळकर, पोपट मोरे, सागर भेळचे संचालक शिवाजी गाडेकर, सागर गाडेकर, चेअरमन अशोक जपकर, मच्छिंद्र होळकर, नाथा जपकर, बाळासाहेब बेल्हेकर, दिलीप होळकर, बापू जपकर, विजय लांडे, बंडू होळकर, कुमार होळकर, बादशाह सय्यद, ओम गाडेकर, धीरज जपकर, जमीर सय्यद, रवींद्र होळकर, जावेद सय्यद, वाजिद सय्यद, गुलाब सय्यद, आयुब सय्यद आदीसह हिंदू मुस्लिम बांधव उपस्थित होते.

सध्या समाजामध्ये जातीपातीचे राजकारण मोठ्या प्रमाणात सुरू असल्यामुळे समाज एकमेकापासून दुरावत चालला आहे. आता समाजाला एकत्र आणण्याचे काम फक्त धार्मिक कार्यक्रमातूनच होऊ शकते. नेप्ती गावातील ग्रामस्थ वर्षभर विविध धार्मिक कार्यक्रम सण मोठ्या उत्साहात साजरे करत असतात. हिंदू मुस्लिम बांधवांनी इफ्तार पार्टीच्या माध्यमातून एकतेचा संदेश देण्याचे काम केले आहे, असे मत सागर गाडेकर यांनी व्यक्त केले.

# बोल फाऊंडेशन व संतजॉन युवक रक्तदात्यांचा सहभाग

नगर – ३० मार्च रोजी ब्रेड ऑफ लाईफ बोल फाऊंडेशन व संत जॉन युवक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जनकल्याण रक्तकेंद्र नगर यांच्या सौजन्याने ५१ रक्तदात्यांनी रक्तदान शिबीरामध्ये सहभाग दर्शविला. उपवास काळ हा मनपरिवर्तनाचा, सकारात्मक, सामाजिक व सत्कार्यांचा पवित्र काळाचे औचित्य राखुन समाजातील गरजू व गंभीर आजारांनी त्रस्त रुग्णांना या शिबीराद्वारे जीवन विस्तारीत करण्याचा सामाजिक उपक्रम आयोजित केला गेला.

संत जॉन चर्च भिंगारचे प्रमुख धर्मगुरु फादर विश्वास परेरा (डॉन बॉस्का) यांच्या हस्ते दिपप्रज्वलन करुन व प्रार्थनेने रक्तदानाच्या शिबीराचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी फादर विश्वास परेरा यांनी परमेश्वराने मानवी जीवनामध्ये दिलेल्या रक्ताचा उपयोग रक्तदानाने करुन गरजवंत रुग्णांना जीवनदान द्यावे हा संदेश या प्रसंगी दिला. या प्रसंगी फादर रिचर्ड डिसीलव्हा डॉन बॉस्को, सावेडी यांनी आपली उपस्थिती दर्शवुन देवाने माणसाला दिलेल्या भरपूर रक्तदानाद्वारे मानवाने मानवासाठी जीवनदान द्यावे हा पवित्र हेतु संबोधीत केला. फादर ब्लेझ फर्नांडिस यांनी या प्रसंगी रुग्णांसाठी विशेष प्रार्थना करुन रक्तदात्यांनी रक्तदानात सहभाग द्यावा म्हणून आवाहन केले.



ब्रेड ऑफ लाईफ बोल फाऊंडेशन व संत जॉन युवक संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने आणि जनकल्याण रक्तकेंद्र नगर यांच्या सौजन्याने आयोजित रक्तदान शिबीरामध्ये सहभागी झालेले रक्तदाते.

या प्रसंगी बोल फाऊंडेशनचे संचालक अमित पाटोळे यांनी संपूर्ण कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रभावीपणे केले. या रक्तदानाच्या शिबीराचा केंद्रबिंदू हा मानवधर्म आहे व तो आपण सर्वांनी जपला पाहिजे असे सचिव सौ. शोभा पाटोळे यांनी प्रतिपादन केले. जनकल्याण रक्तकेंद्राचे डॉ. मढीकर व डॉ. झेंडे त्याचप्रमाणे जनसंपर्क अधिकारी सोनाली खांडरे यांच्या मार्गदर्शनाखाली हे रक्तदान शिबीर यशस्वीरीत्या पार पडले. सर्व जातीधर्माती युवकांनी रक्तदान शिबीरात भाग घेतला होता.

५१ रक्तदात्यांनी आपल्या स्वयंस्फूर्तीने व उत्सफूर्तपणे नांवनोंदणी केली, त्यापैकी ३६ रक्तदाते रक्तदान करण्यास पात्र ठरले. यावेळी सर्व रक्तदात्यांना सन्मानचिन्ह, सन्मानपत्र व श्रीफळ देऊ गौरविण्यात आले.

फाऊंडेशनचे चेअरमन जोसेफ पाटोळे, सचिव शोभा पाटोळे, संचालक अमित पाटोळे व स्वयंसेवक नीतीन पाटोळे, आरती नीतीन पाटोळे, ॲड. पिंटू पाटोळे, काजल पिंटू पाटोळे, अनिकेत पाटोळे, आदित्य पाटोळे, अंतोन पाटोळे, रुबेन मुदलियार यांचे सहकार्य लाभले. या प्रसंगी संत जॉन युवक संघटनेतर्फे कुमारी सेरेना अनिल के. बी. हिने मनोगत व्यक्त केले.

# चेकचा अनादर झाला म्हणून शिक्षा

नगर – कामरगाव, ता. जि. अहमदनगर येथील रहिवाशी संदिप पोपट ढवळे यास निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ मध्ये अतिरीक्त चिफ ज्युडिशियल मॅजि. निराळे मॅडम यांनी ६ महिन्याचा कारावास व १०,३५,००० रु. नुकसान भरपाई म्हणून फिर्यादी कै. राजीव गांधी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत, शाखा कामरगाव, ता.जि.अहिल्यानगर यांना देण्याचा हुकुम केला. कोर्टाच्या आदेशा–प्रमाणे नुकसान भरपाईची रक्कम १ महिन्याच्या आत न भरल्यास आरोपीस १ महिन्याच्या कारावासाची शिक्षा सुनावलेली आहे.

कै. राजीव गांधी नागरी सहकारी पतसंस्था मर्यादीत शाखा कामरगाव, ता.जि. अहिल्यानगर येथुन संदिप पोपट ढवळे याने व्यवसायवाढीसाठी २३ मार्च २०१६ रोजी रु.१६,००,००० चे कर्ज घेतले होते. कर्ज थकीत गेल्यानंतर थकीत रकमेपोटी रु.६,३५,००० चा चेक १६ जून २०१७ रोजीचा त्यांचे खाते असलेला स्टेट बँक ऑफ इंडीया शाखा चास, ता.जि.अ.नगर या बँकेचा चेक दिलेला होता. तो फिर्यादी पतसंस्थेने ए.डी.सी.सी. बँक, शाखा कामरगाव, ता.जि.अ.नगर येथे वटण्यासाठी भरला असता खात्यात पुरेशी रक्कम शिल्लक नसल्यामुळे तो न वटता परत आला. त्यामुळे फिर्यादी पतसंस्थेने संदिप पोपट ढवळे यांचे विरुध्द निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट कलम १३८ प्रमाणे बबन तुळशीराम टांगळ यांच्यातर्फे केस दाखल केली होती. त्याचा निकाल वरीलप्रमाणे झालेला आहे.

फिर्यादी पतसंस्थेतर्फे ॲड. बाबासाहेब एन. रणसिंग व ॲड. विनोद बी. रणसिंग यांनी काम पाहिले.

# युवा मानस

# जिथे आकाश ठेंगणे...

हिंदी साहित्यातील महान कवी, कथाकार आणि गझलकार दुष्यंत कुमार यांची एक ओळ खूप प्रसिद्ध आहे. 'कोण म्हणतं आकाशात छिद्र असू शकत नाही. मित्रांनो, मनापासून दगड तर मारून बघा...' या अर्थाच्या ओळी जगात कोणतेही काम अशक्य नाही, हेच सांगून जातात. फक्त हाती घेतलेले काम पूर्ण उत्साहाने आणि दृढ हेतूने केले पाहिजे. आपल्या कामाद्वारे 'क्लिअर कार रेंटल सर्व्हिस'चे मालक सचिन काटे यांनी ही म्हण खरी ठरविली आहे.

संघर्ष प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात येतो; पण हिंमत असणारे त्यावर मात करू शकतात. सचिन यांच्याकडे पाहिल्यावर या विधानातील सत्यता पटते. सचिन अशा ठिकाणाहून आले आहे, जिथे लोकांना स्टार्टअप या शब्दाशी काही देणेघेणे नव्हते. असे असूनही त्यांनी स्वतःचा स्टार्टअप सुरू केला नाही तर सुमारे २०० कोटी रुपयांची कंपनी बनवून एक आदर्श निर्माण केला. सचिन यांच्या यशाच्या वाटचालीत अनेक अडथळे आले. पण त्यामुळे निराश होण्याऐवजी त्यांचा उपयोग प्रगतीच्या पायऱ्या म्हणून केला. समाजाच्या रूढीवादी विचारांच्या पलीकडे जाऊन त्यांनी आदर्श घालून दिला आहे, ज्यातून प्रत्येक तरुण काहीतरी करायला शिकतो.

**तरुण वय, मोठी स्वप्ने**

अचिव्हर



सचिन काटे यांचा जन्म महाराष्ट्रातील छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील एका छोट्याशा गावात गरीब शेतकरी कुटुंबात झाला. त्यांचे कुटुंब केवळ आर्थिक संकटातून जात नव्हते तर त्यांच्यापुढील सामाजिक आणि शैक्षणिक आव्हानेही मोठी होती. गावातच चौथीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर वडिलांनी त्यांना पुढील शिक्षणासाठी मित्राच्या घरी पाठवले. मात्र शहरात टिकून राहण्याचे मोठे आव्हान होते. त्यासाठी त्यांनी वर्तमानपत्रे विकण्यास सुरुवात केली. ते सकाळी घरोघरी जाऊन वृत्तपत्रे वाटायचे, त्यानंतर शाळेत जाऊन अभ्यास करायचे. मात्र लहान वयातही त्यांची स्वप्ने मोठी होती. ती पूर्ण करण्यासाठी कितीही कष्ट करण्याची तयारी होती.

**अर्धवेळ पगार, पूर्णवेळ नोकरी**

आव्हानांशी झुंज देत त्यांनी दहावी उत्तीर्ण केली आणि कसातरी अकरावीला प्रवेश मिळवला. पण शिक्षणाचा स्तर वाढू लागला तसतसा खर्चही वाढू लागला. दरम्यान, त्यांना एका कॉम्प्युटर इन्स्टिट्यूटमध्ये ऑफिस बॉय म्हणून नोकरी मिळाली. त्यामुळे पैशांची समस्या काही प्रमाणात कमी झाली. येथे काम करत असताना सचिन यांनी संगणकाशी संबंधित बारकावे शिकण्याची एकही संधी सोडली नाही. त्याचा परिणाम असा झाला, की बारावी पूर्ण झाल्यावर त्यांनी वेब डेव्हलपमेंट कंपनीत अर्धवेळ नोकरी स्वीकारली. तिथे अर्धवेळ पगार मिळत होता. पण ते पूर्णवेळ काम करायचे कारण तिथे खूप काही शिकायला मिळत होते. त्याचबरोबर प्रवास आणि आदरातिथ्य या क्षेत्रातही त्यांनी प्रावीण्य मिळवले. बारावी झाल्यावर एका ट्रॅव्हल एजन्सीत ट्रॅव्हल एजंटची नोकरी लागली.

**चार लोकांपासून सुरुवात केली**

ट्रॅव्हल एजन्सीमध्ये काम करत असताना ते व्यवसाय करण्याच्या पद्धती आणि धोरणांशी परिचित झाले. याच काळात स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याचा विचार त्यांच्या मनात आला. २०११ मध्ये त्यांनी याची अंमलबजावणी केली आणि चार सदस्यांच्या टीमसह 'क्लिअर कार रेंटल प्रायव्हेट लिमिटेड'ची स्थापना झाली. कंपनी वेगाने वाढू लागली. चार सदस्यांच्या टीमनिशी सुरू झालेली 'क्लिअर कार रेंटल' सेवा आज भारतातील २४० हून अधिक शहरांमध्ये सुमारे १४,००० कॅबसह कार्यरत आहे. सचिन काटे यांच्या मेहनतीचा अंदाज यावरून लावता येतो की, ते ना सुटी घेतात ना त्यांच्या कामाच्या तासांची नोंद आहे.

आज त्यांच्या कंपनीची उलाढाल सुमारे दोनशे कोटी रुपये आहे. ती भारतातील सर्वात वेगाने वाढणाऱ्या स्टार्टअपपैकी एक आहे. कार भाड्याने देण्याच्या उद्योगात क्रांती घडवून आणेल अशा प्रकारे उत्पादने, सेवा आणि तंत्रज्ञान विकसित आणि लॉन्च करण्याचे त्यांचे उद्दिष्ट आहे. ते लवकरच साध्य होवो ही शुभकामना.

## फंडू एसएमएस

मैं भी हुआ करता था वकिल
इश्क वालों का कभी...
नजरे उस से क्या मिलीं,
आज खुद कटघरे में हूं।

आरजू होनी चाहिए
किसी को
याद करने की, लम्हें तो,
अपने आप ही मिल जाते हैं।

मेरी जिंदगी में खुशियां तेरे
बहाने से है,
आधी तुझे सताने से है
आधी तुझे मनाने से है।

## टेक अपडेट्स्


### सौर ऊर्जेवर चालणार लॅपटॉप



'लेनोवा' ने सौरउर्जेवर चालणारा लॅपटॉप बाजारात आणला असून त्याची बॉडी खूप स्लीक आणि स्लिम आहे. त्यामुळे तुम्ही तो कधीही, कुठेही घेऊन जाऊ शकता. लॅपटॉपच्या डिस्प्लेच्या मागे एक सोलर पॅनेल ग्रिड आहे. त्यामुळे लॅपटॉपच्या बिल्ट-इन बॅटरीला पॉवर मिळवण्यासाठी आणि चार्ज करण्यासाठी थेट सूर्यप्रकाश आणि इनडोर लाइटिंग या दोन्हीमधून मिळणारी ऊर्जा वापरता येणार आहे. 'लेनोवो' कंपनीचे म्हणणे आहे, की हा लॅपटॉप नऊ तासांच्या सौरऊर्जेत ०-८६ टक्क्यांपर्यंत चार्ज होऊ शकतो. हा लॅपटॉप २० मिनिटे उन्हात ठेवला तर बराच वेळ सहजतेने काम करू शकता. 'लेनोवो' ने याबरोबरच सौरऊर्जेवर चालणारा की बोर्ड आणि माउसदेखील लॉंच केला आहे. पावसाळ्याच्या दिवसांमध्ये तुम्ही घरातील वीज वापरुन हा लॅपटॉप चार्ज करू शकाल.

## उपाय

### अमेरिकेत वाटले जातात मोफत एअर टॅग



वस्तू विसरण्याची सवय असली किंवा प्रवासात बॅगेवर लक्ष ठेवण्याची गरज असेल तर एअर टॅग अनेक कामे सुलभ करतो. याद्वारे आता वस्तूंचा मागोवा घेतला जाऊ शकतो. याच्या मदतीने तुम्हाला कुठली वस्तू कुठे ठेवली आहे किंवा ती कुठे पोहोचली आहे हे घरातूनच कळू शकते. झाले असे की, कार चोरीच्या घटनांमुळे अमेरिकेतील डेन्व्हर शहरात राहणारे लोक काळजीत होते. तेव्हा अशा घटनांना आळा घालण्यासाठी स्थानिक पोलीस लोकांना आता या 'एअरटॅग' आणि 'सॅमसंग स्मार्टटॅग'चे वाटप करत आहेत. हे टॅग कार चोरीच्या घटना थांबवू शकत नाहीत; परंतु त्याद्वारे गाड्यांवर लक्ष ठेवणे सोपे होईल, असा पोलिसांचा दावा आहे. यासाठी डेन्व्हर पोलिसांनी 'कोलोरॅडो ऑटो थेफ्ट प्रिव्हेन्शन अथॉरिटी'शी भागीदारी केली आहे. या भागीदारीअंतर्गत लोकांना एअर टॅग आणि स्मार्ट टॅग वितरित करण्यात आले आहेत.

## टेक टॉक

### वाय-फाय राऊटर सुरू ठेवणे फायदेशीर




वाय-फाय राउटर २४/७ सुरू ठेवणे हा सर्वोत्तम पर्याय आहे. कारण काही राउटर त्यांच्यासाठी कनेक्टिव्हिटी अनुभव सुनिश्चित करतात आणि डिव्हाइसला योग्यरित्या कार्य करण्यास मदत करतात. काहीजण रात्री वायफाय बंद करतात. त्यामुळे वीजबिलाची बचत होते, असे त्यांना वाटते. पण हे खरे नाही. रात्रीच्या वेळी वाय-फाय राउटर बंद करून ठेवला तरी ही बचत इतकी कमी आहे की त्याचा वीज बिलात फारसा फरक दिसणार नाही. लोक सहसा राउटर बंद करत नाहीत कारण ते २४/७ चालण्यासाठीच डिझाइन केलेले असतात. उलटपक्षी वारंवार चालू-बंद केल्याने त्याचे आयुष्य कमी होऊ शकते.

# नीता अंबानीसारखी ज्वेलरी, तीही शंभर रुपयांत !

जगातील सर्वात मोठ्या उद्योगपतीची पत्नी असणाऱ्या नीता अंबानी यांनी स्वतःची एक खास ओळख निर्माण केली आहे. नीता अंबानी आपल्या पेहरावातून, आभुषणांमधून भारतीय संस्कृतीचे सादरीकरण करतात. त्या वेगवेगळ्या प्रकारचे डिझायनर दागिने घालताना दिसतात. भारतात सणांचा हंगाम नेहमीच असतो. एकामागून एक सण साजरे होत असतात. तेव्हा तुम्हीही घरातील महिलावर्गाला वा मैत्रिणींना अशी आभुषणे भेट म्हणून देऊ शकता. यावेळी तुम्ही नीता अंबानी यांची शैलीही कॉपी करू शकता. नीता अंबानी ज्वेलरी घालतात त्याच डिझाइनचे दागिने तुम्ही अवघ्या १००-२०० रुपयांमध्ये खरेदी करू शकता. भेट म्हणून मिळालेले असे दागिने नक्कीच आकर्षणाचे केंद्र बनतील.

नीता अंबानी यांनी मुलाच्या लग्नात पाचूचा एक आकर्षक हार घातला होता. त्याला जोडलेले पान इतके मोठे होते, की परदेशी फॅशन ब्लॉगर्सही थक्क झाले होते. आता त्याची स्वस्त आवृत्ती बाजारात विकली जात आहे. एक सामान्य व्यक्तीही ती सहजपणे खरेदी करू शकतो. नीता अंबानी यांचा अशा प्रकारचा दागिना परिधान केलेला फोटो 'सोशल मीडिया'वर आला तेव्हापासूनच लोकांमध्ये या नेकपीसची क्रेझ वाढली. नीता अंबानींचा हा दागिना हिरा आणि पाचूने बनलेला आहे. त्याची स्वस्त आवृत्तीही तितकीच देखणी आणि लक्षवेधी आहे. त्यामुळेच ती ग्राहकांच्या पसंतीस उतरत आहे.



गिफ्टिंग

**लोकांची वाढली क्रेझ**

विक्रेत्याच्या म्हणण्यानुसार, करोडो रुपयांचा हार घालणे प्रत्येकाच्या आवाक्यात नाही. त्यामुळेच आम्ही नीता अंबानींच्या नेकलेसची प्रतिकृती तयार केली आहे आणि खोटे हिरे लावून तयार केलेला हार अवघ्या १७८ रुपयांना उपलब्ध आहे. लोकांना हे दागिने खूप आवडतात. यापूर्वी करीना कपूरच्या नेकलेसच्या डिझाईनच्या प्रतिकृती तयार करण्यात आल्या होत्या. लोकांमध्ये त्याचीही क्रेझ बघायला मिळाली होती. तेव्हा तुम्हीही असे स्वस्त आणि मस्त गिफ्ट निवडा आणि लाडक्या व्यक्तीला खुश करा.



# करीअर निवडताना...

आपण स्वतःला पारंपरिक साच्यात बसवून घेतो. लोकांचे सल्ले ऐकून नेहमीची वाट निवडतो. मग आपलं रूटीन सुरू होतं. काम होत असतं. पैसेही मिळत असतात. पण यातून समाधान काही लाभत नाही. कामाच्या रेट्यात आपल्या आवडीनिवडी बाजूला ठेवाव्या लागतात. डॉक्टर, इंजिनिअर, सीए होण्याचे दिवस आता मागे पडले आहेत. आज तुम्ही तुमच्या आवडत्या क्षेत्रात करीअर करू शकता. संधींची अजिबात कमतरता नाही. आपली जीवनशैली, आवडीनिवडी यांचा विचार करून करीअरची वाट निवडा. यासाठी नेमकं काय करायला हवं हे जाणून घेऊ या.

करीअर ग्रोथ

* तुम्हाला एकाच ऑफिसमध्ये बसून काम करायला आवडेल का फिरतीची नोकरी पसंत पडेल याचा विचार करा. सतत नव्या गोष्टी शिकण्याची आवड असेल तर फिरतीच्या नोकरीला प्राधान्य द्या. फिरायला आवडत असेल तर पर्यटनासंबंधीच्या करीअरचा विचार करा.
* तुम्हाला महागड्या वस्तू खरेदी कराव्याशा वाटतात का फक्त त्यांचा अनुभव घेऊन तुम्ही सुखावता. ब्रांडेड, महाग वस्तू खरेदी करायला आवडत असेल तर चांगल्या पदावर जाण्याचा प्रयत्न करा. भरपूर पगार असेल तरच तुम्ही अशा वस्तूंच्या खरेदीचा विचार करू शकता.
* सतत कामात राहणं आवडत असेल तर त्या पद्धतीची नोकरी शोधा किंवा कार्यक्षेत्राची निवड करा. स्वतःसाठी वेळ हवा असेल तर तुम्ही व्यवसायाकडे वळू शकता.
* तुम्हाला समाधानापेक्षा महत्त्वाकांक्षा जास्त महत्त्वाची वाटत असेल तर जबाबदारीचं काम घ्या. डेडलाईन्सवर काम करा. कामाचं कौतुक होईल असं बघा. पण तुम्हाला तणावमुक्त, शांत आणि आनंदी आयुष्य जगायचं असेल तर त्याप्रमाणे पर्यायांची निवड करा.



# मध्यप्रदेशातील अपशकुनी महाल

भारतीय इतिहासात डोकावले तर असे अनेक संदर्भ आढळतात जे कायमच भारावून टाकतात. राजेमहाराजांची संस्थाने, त्यांची श्रीमंती, तेथील रुढी आणि परंपरा पाहताना डोळे दिपतात. राजेशाही थाट पाहताना कायमच या राजेरजवाड्यांच्या प्रासादाची अर्थात त्यांच्या आलिशान महालांचीसुद्धा तितकीच चर्चा होते. मात्र अशाच एका महालाला अपशकुनी किंवा दुर्दैवी महाल म्हटले जाते.

मध्य प्रदेशातील दातिया इथं हा महाल असून त्याचं नाव 'सतखंडा महाल' असं आहे. मात्र पाहताक्षणी डोळ्याचं पारणं फेडणाऱ्या या महालाकडे ४०० वर्षांपासून क्वचितच कोणी फिरकलं आहे. इथं आजवर कोणीही वास्तव्य केलेलं नाही. हा अपशकुनी महाल असल्याचं अनेकजण म्हणतात. महाराज बीर सिंह देव यांनी या महालाची उभारणी केली; पण त्यांच्या कुटुंबानं कधीच या महालाचा वापर केला नाही.

नवल


**पाण्याखाली मजले**

सतखंडा महालाच्या निर्मितीसाठी कोणत्याही लाकूड अथवा लोखंडाचा वापर झालेला नाही. इतकंच नव्हे तर या महालाच्या सातपैकी दोन मजले पाण्याखाली आहेत. १६२० मध्ये दतियाचे राजा बीर सिंह यांनी ३५ लाख रुपये खर्चून हा महाल बांधला होता. अतिशय बारीक नक्षीकामामुळं त्याच्या पूर्णत्वासाठी तब्बल नऊ वर्षांचा काळ लागला. महालाचं आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे इथं मंदिर आणि मशीद दोन्हीही आहे.

**४४० खोल्या, शेकडो खिडक्या**

४४० खोल्या, शेकडो खिडक्या आणि झरोके असणारा हा महाल आहे. मुगल शासक जहांगीरच्या स्वागतासाठी त्याची उभारणी करण्यात आली होती. असं म्हणतात की. राजा बीर सिंह देव यांनी शहाजहाला सिंहासनारुढ होण्यासाठी प्रचंड मदत केली होती. त्यामुळे या राजाच्या वाट्याला सिंहासन आलं. जहांगीर इथं आला तेव्हा त्यानं फक्त एका रात्रीचा मुक्काम या महालात केला होता. मात्र तेव्हापासून हा महाल निर्मनुष्य आहे. या महालाची प्रत्येक कमान, प्रत्येक चौक आणि महालातील प्रत्येक नक्षी इतिहासाची साक्ष देणारी असून अद्वितीय कलेचा तो नमुना आहे. पण कोणाचाही वावर नसल्यामुळं काळानुरुप या महालाकडे पाहण्याचा अनेकांचा दृष्टीकोन बदलला आहे. आता त्याला अपशकुनी महाल म्हणूनच ओळखले जाते.


# आरामदायी टी शर्ट




झटपट आवरायचं असो किंवा काय घालायचं या प्रश्नाचं उत्तर शोधायचं असो, कॉलरवाल्या टी शर्टना पर्याय नाही. कोणत्याही ऑकेजनला, कुठल्याही बॉटमवर हे कॉलरवाले ट्रेंडी टी शर्ट चालून जातात. ते स्टायलिश तर आहेतच शिवाय उन्हाळ्यात आरामदायी ठरतात. तेव्हा नव्या खरेदीच्या विचारात असाल तर कॉलरवाल्या ट्रेंडी टी शर्टना प्राधान्य द्या.

फॅशन पॅशन

* प्रिंटेड टी शर्ट मन मोहवून टाकतात. त्यातच तो ब्लॅक टी शर्ट असेल तर त्यावरच्या प्रिंट्स अजूनच खुलून दिसतात. त्यातच काळा रंग कशावरही शोभून दिसतो. काळ्या रंगात तुम्ही कॅमोफ्लेज प्रिंट्सची निवड करू शकता.
* पांढरा हा आपल्या आवडीचा रंग. कॉलरवाला व्हाईट टी शर्ट तुमच्याकडे असेल तर उन्हाळ्यात काळजीचं काहीच कारण नाही. पांढऱ्या रंगाचे प्रिंटेड किंवा प्लेन कॉलरवाले टी शर्ट तुम्ही घालू शकता.
* गडद रंगाच्या पोलो टी शर्टमुळे तुम्ही उठून दिसाल. केशरी, पिवळा, लाल, जांभळा या रंगाचे प्लेन टी शर्ट घ्या. ट्राउझर, जीन्सवर ते सहज कॅरी करता येतील.
* यंदा थोड्या हटके रंगांना प्राधान्य देता येईल कारण आता मुलांची फॅशनही आता रंगीबेरंगी झाली आहे. ब्राउन, बेच, बरगंडी असे रंगही ट्राय करता येतील.
* काळ्या-पांढऱ्या कपड्यांचा कंटाळा आला असेल तर लाल, मरून शेड्स ट्राय करा.





# पर्यटनासाठी निवडा ही ठिकाणे

आजकाल जीवनशैली अत्यंत धावपळीची झाली आहे. त्यामुळे फिरायला जाण्यासाठी वेळ काढता येत नाही. कधी परीक्षेमुळे तर कधी ऑफिसमधून सुट्ट्या नसल्यामुळे प्रवासाचा बेत नेहमीच अपूर्ण राहतो. पण तुम्हीही या लोकांपैकी एक असाल तर या महिन्यात बाहेर फिरायला जाण्याचा प्लॅन बनवू शकता.

एप्रिलमध्ये हवामान चांगले असते. त्यातच एप्रिल महिन्यामध्ये तीन दिवसांच्या सुट्ट्या एकत्र आहेत. १८ तारखेला गुड फ्रायडे, १९ तारखेला शनिवार आणि २० तारखेला रविवार आहे. अशा परिस्थितीत तुम्हाला शनिवार आणि रविवारी सुट्टी असेल तर एक दिवस सुट्टी घेऊन चार दिवसांसाठी सहलीला जाण्याचा प्लॅन करू शकता.

भटकंती

**नैनिताल**

नैनिताल हे उत्तराखंडमधील सर्वात लोकप्रिय ठिकाणांपैकी एक आहे. तुम्ही येथे अनेक ठिकाणे एक्सप्लोर करू शकता. नैनिताल तलावाला भेट देऊ शकता. याशिवाय तुम्ही टिफिन टॉप, पँगोट आणि किलबरी पक्षी अभयारण्य, नैना पीक, इको केव्ह गार्डन, जीबी पंत हाय अल्टिट्यूड प्राणीसंग्रहालय, स्नो व्ह्यू पॉइंट आणि सरिता ताल यासारखी अनेक सुंदर ठिकाणं एक्सप्लोर करू शकता. नैना देवी मंदिर नैनी तलावाच्या काठावर आहे. येथे दर्शनासाठी जाऊ शकता.

**जयपूर**

तुम्ही जयपूरला तीन दिवसांच्या सहलीसाठी भेट देऊ शकता. येथे भेट देण्यासाठी अनेक सुंदर आणि ऐतिहासिक ठिकाणे आहेत. इथे आमेर किल्ला, सिटी पॅलेस, हवा महल, नाहरगड किल्ला, जयगड किल्ला, जल महल आणि जंतरमंतर अशा अनेक प्रसिद्ध ठिकाणांना भेट देऊ शकता. याशिवाय जवळच्या बाजारपेठेत खास वस्तू खरेदी करू शकता. जोहरी बाजार आणि बापू बाजार हे येथील प्रसिद्ध बाजारपेठांपैकी एक आहेत.

**कसोल**

हिमाचल प्रदेशातील कसोल हे ठिकाण तीन दिवसांमध्ये भेट देण्यासाठी उत्तम ठरेल. तुम्ही येथे मणिकरण साहिब गुरुद्वारा आणि मणिकरण शिव मंदिराला भेट देऊ शकता. याशिवाय, तुम्ही येथून दोन किलोमीटर अंतरावर असणाऱ्या खीरगंगेला जाऊ शकता. हिरव्यागार टेकड्या आणि त्यावर असलेले निळे आकाश हे दृश्य पाहून खूप मनमोहक वाटेल. तुम्ही येथील निसर्गाच्या सानिध्यात हरवून जाल. तसेच तुम्ही मलाना गावाला भेट देऊ शकता. हे ठिकाण देव टिब्बा आणि चंद्रखानी टेकड्यांनी वेढलेले आहे.



# उन्हाळ्यात गुलाबपाणी वापरताय, सावधान!

गुलाबपाणी हे एक नैसर्गिक टोनर आहे. ते त्वचेसाठी खूप फायदेशीर मानले जाते. हे नैसर्गिक घटकांनी समृद्ध असल्यामुळे वापरल्यानंतर त्वचेला ताजेपणा आणि ओलावा मिळतो. गुलाबपाण्याचा वापर त्वचा ताजेतवानी करण्यासाठी, दाहक-विरोधी गुणधर्मांमुळे त्वचेची जळजळ कमी करण्यासाठी आणि मुरुम आणि मुरुमांवर उपचार करण्यासाठीदेखील केला जातो. पण उन्हाळ्यात सतत गुलाबपाणी लावणे चेहऱ्यासाठी घातक ठरु शकते, हेदेखील लक्षात घ्यायला हवे.

जास्त प्रमाणात गुलाबपाणी वापरले तर त्वचेला हानी पोहोचवू शकते. गुलाबपाण्यात सौम्य तुरट गुणधर्म असतात. त्यामुळे वारंवार वापरल्यास त्वचेतील नैसर्गिक तेल कमी होऊ शकते. त्यातील गुणधर्म त्वचेवरील अतिरिक्त घाण आणि तेल काढून टाकण्यास मदत करतात हे खरे, परंतु गुलाबपाण्याचा जास्त वापर केला तर ते त्वचा खूप कोरडी करू शकते. अर्थातच कोरड्या त्वचेमुळे खाज सुटणे आणि जळजळ असा त्रास होऊ शकतो.

स्किन केअर

*** ॲलर्जीचा वाढता धोका**

गुलाबपाणी नैसर्गिक मानले जात असले तरी कधीकधी त्याचा जास्त वापर केल्याने ॲलर्जी होऊ शकते. ॲलर्जीच्या लक्षणांमध्ये त्वचेचा लालसरपणा, पुरळ, खाज सुटणे आणि जळजळ होणे यांचा समावेश असू शकतो. म्हणूनच पहिल्यांदाच गुलाबजल वापरत असाल तर त्वचेच्या छोट्या भागावर चाचणी करून पाहा आणि ॲलर्जी न आल्यासच पुढे वापर करा.


*** त्वचेची पीएच पातळी ढासळणे**

गुलाबपाणी जास्त प्रमाणात वापरत असाल तर ते त्वचेची पीएच पातळी खराब करू शकते. यामुळेही त्वचेची जळजळ, खाज सुटणे किंवा पुरळ येऊ शकतात. म्हणूनच गुलाबजल वापरताना संवेदनशील त्वचा असणाऱ्यांनी अधिक काळजी घ्यावी.

# सावेडी प्रभाग क्रमांक सहा भाजपाचा बालेकिल्ला

## वसंत लोढा यांचे प्रतिपादन

नगर – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व भारतीय जनता पार्टी प्रदेशाध्यक्ष चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनानुसार अहिल्यानगर शहरात बुथ कमिटी गठण करण्यात येत आहे. प्रभाग क्रमांक ६ भाजपाचा महत्त्वाचा मानला जातो. या प्रभागाने ४ नगरसेवक निवडून देऊन शहराला महापौर पद मिळवून दिले आहे. बुथ कमिट्या पूर्ण करण्यासाठी रवींद्र बारस्कर, माजी महापौर बाबासाहेब वाकळे, नगरसेविका वंदनाताई ताठे, नगरसेविका पल्लवीताई जाधव यांनी चांगले काम केले आहे. सावेडी गावात व परिसरात भाजपचे वर्चस्व आहे. तसेच तरुणांचा मोठा सहभाग बुथ कमिट्यामध्ये झालेला दिसत आहे. केंद्र सरकार व राज्य सरकारच्या योजना नागरिकांपर्यंत पोहोचविण्यासाठी बुथ कमिटीचे लाभार्थी प्रमुख महत्त्वाची भूमिका बजावतील. तसेच प्रभाग क्रमांक सहा मधील बुथ कमिटी एक आदर्श निर्माण करेल. येणाऱ्या महापालिकेच्या निवडणुकीत भाजपाचा झेंडा फडकेल. प्रभाग क्रमांक सहा भाजपाचा बालेकिल्ला आहे, असे प्रतिपादन प्रभाग क्रमांक ६ चे निरीक्षक तथा प्रदेश सदस्य वसंत लोढा यांनी केले आहे.



सावेडीगाव येथे झालेल्या भाजपा बूथ कमिटीच्या बैठकीमध्ये मार्गदर्शन करताना प्रदेश सदस्य वसंत लोढा आदी.

### प्रभाग सहा मध्ये बुथ कमिटीची बैठक

सावेडीगाव येथे रवींद्र बारस्कर यांच्या निवासस्थानी बूथ कमिटीची बैठक निरीक्षक बाळासाहेब भुजबळ (ओबीसी मोर्चाचे शहर जिल्हाध्यक्ष) यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. याप्रसंगी प्रमुख उपस्थितीत वसंत लोढा हे होते. या बैठकीत बुथ क्रमांक ७४च्या अध्यक्ष थंगवेल स्वामी– सूचक गणेश विखे, सरचिटणीस राजेश टाके, बूथ क्रमांक ७६चे अध्यक्ष रवींद्र बारस्कर– सूचक अवधूत बारस्कर, सरचिटणीस राम बारस्कर यांची निवड करण्यात आली आहे. तसेच मन की बात प्रमुख, लाभार्थी प्रमुख, बुथ अध्यक्ष यांच्या नेमणुका करण्यात आल्या आहेत. या नेमणुका निरीक्षक वसंत लोढा, बाळासाहेब भुजबळ यांच्या उपस्थितीत करण्यात आल्या आहेत. यावेळी रवींद्र बारस्कर, श्रीकांत कुलकर्णी, प्रकाश गोसावी, सुरेश चव्हाण, आदित्य करपे, गिरीश वाकळे, राम बारस्कर, अवधूत बारस्कर, जयदीप बारस्कर, गणेश विखे, कृष्णा गडाख, अभिषेक ढोले, आदित्य पाटील, कार्तिक मिश्रा, जितेश मनकानी, अभिषेक करपे आदी उपस्थित होते.

बाळासाहेब भुजबळ म्हणाले, अहिल्यानगर शहरात भाजपमय वातावरण झालेले आहे. या बुथ कमिटीच्या माध्यमातून व्हाट्सअप प्रमुख, मन की बात प्रमुख, लाभार्थी प्रमुख तसेच बुथ कमिटी अध्यक्ष या नेमणूक होत आहेत. पार्टीने बुथ कमिटीला विशेष महत्त्व दिले आहे. १८ वर्षावरील मतदारांची नाव नोंदणीचे काम या कमिटीच्या वतीने करण्यात येणार आहे. या प्रभागामध्ये रवींद्र बारस्कर, बाबासाहेब वाकळे, वंदनाताई ताठे, पल्लवीताई जाधव यांनी कमिट्या पूर्ण करण्यासाठी चांगले काम केले आहे.

रवींद्र बारसकर म्हणाले, वसंत लोढा व बाळासाहेब भुजबळ यांच्या मार्गदर्शनाखाली व युवकांच्या उपस्थितीत कमिटी करण्यात आली. प्रभाग क्रमांक ६ मध्ये महापौर पद लाभल्याने बाबासाहेब वाकळे यांच्या माध्यमातून प्रभागात मोठ्या प्रमाणात विकास कामे झालेली आहेत. या प्रभागातील तयार झालेल्या बुथ कमिट्या सक्षमपणे काम करून पक्षाला मजबूत करतील. असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

प्रभाग क्रमांक ६ मध्ये बुथ कमिटीची तिसरी बैठक झाली. यावेळी कार्यकर्ते व पदाधिकारी उपस्थित होते. अवधूत बारस्कर यांनी आभार मानले.



हिंद सेवा मंडळाच्या मेहेर इंग्लिश स्कूलच्या वतीने नगर मधील गुढीपाडवा शोभायात्रेत सहभाग घेतला होता. यावेळी स्कूलचे अध्यक्ष जगदीश झालानी, प्राचार्या अनुरीता झगडे सह पारंपारिक वेशभुषेत विद्यार्थी, शिक्षक सहभागी झाले होते.

# महाराष्ट्र वैद्यकीय परिषद मतदानासाठी निश्चित केलेले १२ प्रकारचे पुरावे ग्राह्य

नगर – महाराष्ट्र वैद्यकीय परिषद २०२५ निवडणुकीत मतदान करण्यासाठी १२ पुरावे ओळखीचे पुरावे म्हणून ग्राह्य धरले जाणार असून त्यापैकी कोणताही एक पुरावा दाखविल्यानंतर संबंधितांना मतदान करता येणार असल्याचे जिल्हा प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेच्या निवडणुकीसाठी ४१ उमेदवार निवडणूक लढवत असून त्यापैकी ९ सदस्यांची निवड करण्यात येणार आहे. महाराष्ट्र वैद्यकीय परिषदेकडे नोंदणीकृत वैद्यकशास्त्रातील वैद्यकीय व्यावसायिक हे मतदार असून अहिल्यानगर जिल्ह्यासाठी एकूण २ हजार ६२५ मतदारांची संख्या निश्चित करण्यात आली आहे. ३ एप्रिल रोजी गुलमोहर रोड सावेडी येथील आनंद विद्यालयात सकाळी ८ ते सायंकाळी ५ या वेळेत निश्चित केलेल्या ४ मतदान केंद्रावरुन मतदानाची प्रक्रिया पार पडणार आहे.

मतदानाच्यावेळी मतदारांची ओळख पटविण्यासाठी निश्चित केलेल्या १२ पैकी कोणताही एक पुरावा ग्राह्य धरण्यात येणार आहे. यामध्ये वैद्यकीय व्यावसायिकांना महाराष्ट्र वैद्यक परिषदेने दिलेले नोंदणी प्रमाणपत्र किंवा ओळखपत्र, आधार कार्ड, बँक/पोस्ट कार्यालयाने जारी केलेल्या छायाचित्रासह पासबुक, वाहन चालक परवाना, पॅनकार्ड, रजिस्टार जनरल ऑफ इंडिया यांच्याद्वारा नॅशनल पॉप्युलेशन अंतर्गत निर्गमित स्मार्ट कार्ड, भारतीय पासपोर्ट, फोटोसह पेन्शन दस्तऐवज, केंद्र किंवा राज्य सरकार/सार्वजनिक उपक्रम/ पब्लिक लिमिटेड कंपन्या यांनी कर्मचाऱ्यांना जारी केलेले सेवा ओळखपत्र, खासदार/आमदार यांना जारी करण्यात आलेले अधिकृत ओळखपत्र, भारत सरकारच्या सामाजिक न्याय व सशक्तीकरण मंत्रालयाने जारी केलेले विशेष विकलांगता प्रमाणपत्र आणि निवडणूक ओळखपत्र यापैकी कोणत्याही एका ओळखपत्राची मूळ प्रत मतदानावेळी जवळ बाळगावी, असेही प्रशासनामार्फत कळविण्यात आले आहे.

# स्वच्छता कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीनंतर आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे

## बाबासाहेब मुदगल यांचे प्रतिपादन; मनपा प्रभाग क्रमांक १२ मधील सफाई कर्मचाऱ्यांच्या सेवापुर्तीनिमित्त सत्कार

नगर – महापालिकेचा सफाई कर्मचारी हा समाजातील एक महत्वाचा घटक असून आपण सकाळी घराबाहेर पडतो तेव्हा संपूर्ण शहराची स्वच्छता झालेली असते, त्यामुळे नगरकरांचे आरोग्य सदृढ, निरोगी राहत असते महापालिकेचा स्वच्छता अभियानामध्ये नंबर येत असून त्याचे श्रेय स्वच्छता कर्मचाऱ्यांनाच जाते, स्वच्छता कर्मचाऱ्यांनी ३०–३५ वर्ष नगरकरांचे आरोग्य जपले, आता सेवानिवृत्तीनंतर आपल्या आरोग्याकडे लक्ष द्यावे, मनपा कर्मचारी अजय सौदे त्यांची सफाई कर्मचारी बद्दल असलेली आपुलकी आणि ऋणानुबंध त्यामुळेच सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांचा सत्कार सोहळ्याचा कार्यक्रम केला, आपण अनेक वर्ष एकत्रित काम करत असतो आपल्या सुखदुःखामध्ये सामील होत असतो सेवानिवृत्ती हा सण मनुष्याच्या जीवनातील आठवणीचा दिवस असतो त्या दिवशी त्यांचा सन्मान होणे गरजेचे असल्याचे प्रतिपादन मनपा कर्मचारी युनियनचे अध्यक्ष बाबासाहेब मुदगल यांनी केले.



मनपा प्रभाग क्रमांक १२ मधील सफाई कर्मचाऱ्यांच्या सेवापुर्तीनिमित्त सत्कार करण्यात आला. (छाया – लहू दळवी)

अहिल्यानगर महानगरपालिका प्रभाग क्रमांक १२ मधील सफाई कर्मचाऱ्यांचा सेवापुर्ती निमित्त सत्कार सोहळा झाला. यावेळी बाबासाहेब मुदगल, जितेंद्र सारसर, सचिव आनंद वायकर, नंदकुमार नेमाने, बलराज गायकवाड, बाळासाहेब व्यापारी, सोमनाथ सोनवणे, भरत सारवान, भांगरे, चांदणे, तावरे, ऋषिकेश वाल्मीक, अनिल वाणे, अजय सोदे, सतीश खुडे, कृष्णालाल बेगी, पृथ्वीराज तांबोळी, सचिन लोखंडे, शुभम चांदणे, दीपक अडागळे, शाहू वाघमारे, शुभम साठे आदी उपस्थित होते

प्रभाग क्रमांक १२ मधील स्वच्छता कर्मचारी सेवानिवृत्त असून कर्मचाऱ्यांच्या वतीने सत्कार केला जातो ही बाब कौतुकास्पद आहे, काम करत असताना एकमेकांमध्ये प्रेम आपुलकी भावना असते, सेवानिवृत्तीमुळे दररोज भेटणारा कर्मचारी आता भेटणार नाही, एकमेकांमधील संवाद कमी होईल, सुखदुःखाच्या गोष्टी होणार नाही, मी देखील सफाई कर्मचारी म्हणून पालिकेत काम केले आहे आणि प्रभाग अधिकारी म्हणून सेवानिवृत्त झालो आहे, सफाई कर्मचारी यांचा सेवानिवृत्ती निमित्त सन्मान होणे गरजेचे असल्याचे मत जितेंद्र सारसर यांनी व्यक्त केले

मनपा प्रभाग क्रमांक १२ मधील इंदू खुडे, विजया वैराळ, सविता साठे, संदीप सारवान, सुरेश साठे, विद्या चव्हाण, ललिता दिवटे, कन्हैया चावरे आदी सफाई कर्मचारी सेवानिवृत्त होत असून आम्ही सर्वांनी एकत्रित काम केले आहे. दररोजच्या साफसफाई बरोबरच सांगितलेले वाढीव काम देखील हे कर्मचारी करत असत कधीही कामाचा कंटाळा केला नाही. अनेक वर्ष आम्ही सर्वांनी एकत्रित काम केले असून त्यांचा सेवानिवृत्तीनिमित्त सत्कार सोहळा झाला असल्याचे मत अजय सौदे यांनी व्यक्त केले.

## बुशरा शेख हिचे रमजानचे महिनाभर रोजे



नगर – सोनानगर, सावेडी अहमदनगर येथे राहणारी बुशरा नाझिम शेख (वय ९) हिने रमजानचे महिनाभराचे रोजे (उपवास) केले. नाझीम रफिक शेख –प्लंबर यांची ती कन्या तर बारा इमाम मस्जिद ट्रस्ट, सावेडी चे अध्यक्ष शेख नूर मोहम्मद शफी यांची ती नात आहे.

दिवसभर अन्न, पाणी वर्ज्य करून महिनाभर तिने हे कडक उपवास करून तसेच कुराण पठण करून हे उपवास केल्याने तिचे नातेवाईक व घरातील सदस्यांनी विशेष कौतुक केले आहे. एक महिन्याचे उपवासाने एक नवा आदर्श युवा पिढीला दिला आहे.

# अनिश्चितेच्या युगात हमखास यश संपादनासाठी बदल महत्त्वाचा

## महेंद्र खोलम यांचे आवाहन

नगर – विद्यार्थ्यांनी स्पर्धात्मक युगात यश मिळविण्यासाठी नवनवीन संधी शोधाव्यात शिक्षण घेत असताना नवीन प्रकल्प उभे करून रोजगार निर्मिती कशी होईल. त्या दृष्टीने प्रयत्न करावेत. आपल्या अनुभवातून विविध क्षेत्रात पदार्पण करून स्वतःचा व्यवसाय कसा विकसित करता येईल. त्याला महत्त्व देत सध्याच्या अनिश्चितेच्या युगात हमखास यश संपादन करायचं असेल तर आपल्या जीवनात बदल करीत रहाणे महत्त्वाचे आहे, असे आवाहन माजी विद्यार्थी व महेंद्र टेक्नॉलॉजीज चे सीनियर मॅनेजिंग पार्टनर महेंद्र खोलम यांनी केले आहे.



विळद घाट येथील डॉ.विखे पाटील अभियांत्रिकी महाविद्यालयात वार्षिक पारितोषिक वितरण समारंभ प्रसंगी प्रमुख अतिथी इंजि. अरविंद पारगावकर, महेंद्र खोलम, किरण खिलारी, अँड. वसंतराव कापरे, प्रा.सुनिल कल्हापुरे, डॉ.पी. एम.गायकवाड, प्राचार्य डॉ.उदय नाईक पारितोषिक विजेते विद्यार्थी आदी (छाया – विजय मते)

### विखे पाटील अभियांत्रिकी कॉलेजमध्ये पारितोषिक वितरण

विळद घाट येथील डॉ.विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनच्या अभियांत्रिकी महाविद्यालयात नुकताच वार्षिक पारितोषिक वितरण सोहळा झाला. या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे म्हणून लॉरीझ नूडसेनचे मॅनेजिंग डायरेक्टर इंजिनीअर अरविंद पारगांवकर, विखे पाटील अभियांत्रिकीचे १९९३ बॅचचे माजी विद्यार्थी मेकनिकल इंजिनीअर महिंद्रा टेक्नॉलॉजीचे मॅनेजिंग पार्टनर महेंद्र खोलम २००६ बॅचचे आय.टी.इंजिनीअर व एल.टी.आय. माईंडट्रीचे किरण खिलारी प्रमुख अतिथी म्हणून उपस्थित होते. संस्थेचे विश्वस्त अँड.वसंतराव कापरे, प्रभारी सेकेटरी जनरल डॉ. पी.एम.गायकवाड, डायरेक्टर टेक्निकल सुनिल कल्हापुरे, प्राचार्य डॉ.उदय नाईक कृषि महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.मधुकर धोंडे उपस्थित होते.

प्राचार्य डॉ.उदय नाईक यांनी प्रास्तविकात महाविद्यालयात राबविण्यात आलेल्या विविध स्पर्धा तसेच महाविद्यालयाच्या प्रगतीचा आढावा घेतला. त्याचबरोबर महाविद्यालयात उपलब्ध असलेल्या विविध शाखांची माहिती दिली.

अभियांत्रिकीचे माजी विद्यार्थी इंजिनीअर किरण खिलारी यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना आपल्या महाविद्यालयीन जीवनातील आठवणी सांगितल्या तसेच विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना ए.आय.च्या युगात नवनवीन तंत्रज्ञान आत्मसात करुन त्याचा उपयोग आपले भवितव्य घडवण्यासाठी कसा करता येईल याचे मार्गदर्शन केले. त्याचबरोबर सध्या उपलब्ध असलेले विविध तंत्रज्ञानाविषयी माहिती सांगितले.

यावेळी संस्थेचे विश्वस्त वसंतराव कापरे यांनी आपल्या भाषणात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले की जीवनातील विविध अनुभव हे सध्याच्या स्पर्धात्मक युगात उपयोगी आहे विद्यार्थ्यांनी सतत प्रयत्नशील राहिले पाहिजे तसेच आपला कंफर्ट झोन सोडून स्वयंशिस्तीने स्वतःला विकसित करण्यासाठी कष्टाची आणि आत्मविश्वासाची सांगड घातल्यास यश हमखास मिळेल, असे सांगून पुढील जीवनात यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या.

प्रमुख पाहुणे इंजिनीअर अरविंद पारगांवकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना बुध्दिमत्ता, लक्षकेंद्रीकरण, जागरुकता, चांगले विचार आणि आत्मविश्वास या पंचतंत्राचा जर विद्यार्थ्यांनी जीवनात उपयोग आणून प्रयत्न करत राहिल्यास कुठलेही काम व्यवस्थित पूर्णत्वास जावून लक्ष्य प्राप्त करु शकता असे सांगितले. विविध विभागांतील प्रथम क्रमांक मिळविलेले विद्यार्थी, विविध खेळामध्ये विशेष प्राविण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांना तसेच स्पर्धा परीक्षेमध्ये यश संपादन केलेल्या विद्यार्थ्यांना पारितोषिक देण्यात आले. त्याचबरोबर महाविद्यालयातील पी.एच.डी. अभ्यासकम पूर्ण केलेल्या प्राध्यापकांचा सत्कार करण्यात आला.


तसेच डॉ.विठ्ठलराव विखे पाटील महाविद्यालयाने या वर्षीपासून नव्याने सुरु केलेला सर्वोत्तम विभाग पुरस्कार यावेळी मेकॅनिकल इंजिनीअरींग विभागास देण्यात आला. या निवडीसाठी महाविद्यालयाने एक समिती स्थापन करुन नॅक आणि एन.बी.ए च्या धरतीवर प्रश्नावली तयार करुन महाविद्यालयातील प्रत्येक विभागाचे सूक्ष्म परीक्षण करून समितीच्या अहवालाचे परीक्षण नंतर मेकॅनिकल इंजिनीअरींग या विभागाची निवड करण्यात आली.

कार्यकमाचे नियोजन शिक्षक समन्वयक प्रा.पंकज औताडे, डॉ.संदिप उदावंत तसेच गॅदरींग कोऑर्डिनिटर प्रा.सुनिल मांढरे, प्रा.मंदार बिडवे, महाविद्यालयातील शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी यांनी परीश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. प्रतिभा गायके, माधवी काळे यांनी केले. आभार प्रदर्शन प्रा.मंदार बिडवे यांनी केले. कार्यक्रम आयोजीत करण्यासाठी डायरेक्टर टेक्निकल सुनिल कल्हापुरे, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.उदय नाईक सर्व विभागप्रमुख शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा–यांचे सहकार्य लाभले. पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील, विठ्ठलराव विखे पाटील फौंडेशनचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ.सुजय विखे पाटील यांनी या कार्यक्रमाचे कौतुक केले.

# महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालय आयोजित नगरमधील बालनाट्य प्रशिक्षण शिबीराचा उत्साहात समारोप

## विविध कलाप्रकार सादर करत बाल शिबिरार्थींनी केले उपस्थितांना मंत्रमुग्ध

नगर – महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने आयोजित करण्यात आलेले बालनाट्य प्रशिक्षण शिबीर १७ ते २६ मार्च या १० दिवसांच्या कालावधीत सावेडी उपनगरातील माऊली सभागृहाच्या बेसमेंट हॉल येथे झाले. २७ मार्च रोजी शिबिराचा समारोप करण्यात आला. शिबिरात सहभागी झालेल्या बालशिबिरार्थींना घेऊन माऊली सभागृहाच्या रंगमंचावर विविध कला प्रकारांचे बाल शिबिरार्थींनी सादरीकरण केले. यामध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या जीवनावर आधारित 'एक रात्र गडावर' या बालनाट्यातील चार प्रवेश सादर करण्यात आले. यामध्ये माँ जिजाऊ, छोटे शिवबा, छत्रपती शिवाजी महाराज आणि बाजीप्रभू देशपांडे या भूमिकांना बालकलाकारांनी न्याय देत उत्तम भूमिका साकारत उपस्थितांची दाद मिळवली. शिबिरातील सर्वात छोटा विद्यार्थी ध्वज विराज मुनोत याने 'लोहगड' या गडावर आधारित कथानक सादर केले. राजश्री भणगे हिने नाट्यछटा सादर केली. ३५ बाल शिबिरार्थींनी सादर केलेले 'फुलपाखरू' हे बालनाट्य उपस्थितांच्या दाद मिळविण्यास पात्र ठरले.



महाराष्ट्र शासनाच्या सांस्कृतिक कार्य संचालनालयाच्यावतीने आयोजित करण्यात आलेले बालनाट्य प्रशिक्षण शिबीर सावेडी उपनगरातील माऊली सभागृहाच्या बेसमेंट हॉल येथे झाले.

अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे मध्यवर्तीचे नियामक मंडळ सदस्य क्षितिज झावरे, नाट्यकर्मी अविनाश कराळे, बालरंगभूमी परिषदेचे सचिव प्रसाद भणगे, श्रिया देशमुख, शिबीर संचालक अनंत जोशी यांच्या हस्ते दीपप्रज्वलन करून उद्घाटन करण्यात आले.

यावेळी क्षितिज झावरे आणि यांनी मनोगतातून शासनाच्या या उपक्रमाचे कौतुक करत शिबिरार्थींना या शिबिराचा आपल्या दैनंदिन जीवनात मोठा फायदा होणार असल्याचे प्रतिपादन केले.

शिबीर संचालक अनंत जोशी यांनी प्रास्ताविकातून बाल शिबिरार्थींवर केलेल्या संस्काराचे महत्व विशद केले. समन्वयक सागर मेहेत्रे यांनी सूत्रसंचालन केले तर जालिंदर शिंदे यांनी आभार मानले.

या शिबिरात अहिल्यानगर येथील नाट्यकर्मी गणेश लिमकर, आबा सैंदाणे, शैलेश देशमुख, श्याम शिंदे, धनंजय सरदेशपांडे, वैशाली पाटील गोस्वामी, नाना मोरे, तेजस अतितकर, अनंत जोशी यांनी विविध विषयांवर संस्काराचे धडे दिले. या उपक्रमासाठीची संकल्पना सांस्कृतिक कार्य आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री आशिष शेलार आणि सांस्कृतिक कार्य संचालनालयाचे संचालक विभीषण चवरे यांची होती.

## अग्निवीर सैन्य भरतीसाठी ऑनलाईन अर्ज सादर करावेत

नगर – जिल्ह्यातील अविवाहित युवकांना भारतीय सैन्य दलामध्ये देशसेवेसाठी अग्निवीर सैन्य भरतीसाठी १० एप्रिल २०२५ पर्यंत www.joinindianarmy.nic.in या संकेतस्थळावर अर्ज करता येणार आहेत. यासाठी सामान्य प्रवेश परीक्षा जून २०२५ मध्ये घेण्यात येणार असून अधिकाधिक युवकांनी या संधीचा लाभ घेण्याचे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अहिल्यानगर यांनी केले आहे.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

